RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
१५ बुधवार
एप्रिल २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक ३१९
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३

## शेतकऱ्याने मृत्युला कवटाळले

**▸विदर्भ केसरी।**

५२ वर्षीय शेतकरी लक्ष्मण भानुदास क्षीरसागर यांनी कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली. मंगळवारी (१४ एप्रिल) दुपारी २ वाजेच्या सुमारास त्यांनी स्वतःच्या शेतात गळफास घेऊन आयुष्य संपवले. बीड तालुक्यातील बोरखेड येथे ही घटना घडली. त्यांचा मृतदेह लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आला, पण नातेवाईकांना शवविच्छेदनासाठी दोन तास ताटकळत उभे राहावे लागले. लक्ष्मण क्षीरसागर यांच्यावर कर्ज होते अशी माहिती मिळाली. कर्जामुळे ते गेल्या काही दिवसांपासून विवंचनेत होते. मंगळवारी दुपारी त्यांनी शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच लिंबागणेश पोलीस ठाण्याचे कर्मचारी गणेश परझने, मन्सूर शेख व अविनाश घुंगरड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवला. लिंबागणेश आरोग्य केंद्रात शवविच्छेदनाची सोय नसल्याचा प्रकार वारंवार घडत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.

## PM मोदी आणि ट्रम्प यांच्यात फोनवरून चर्चा

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली**

मध्य पूर्व आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या युद्धबंदीच्या करारानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात पहिली दूरध्वनी चर्चा पार पडली. सुमारे ४० मिनिटे चाललेल्या या संभाषणात दोन्ही नेत्यांनी जागतिक आणि द्विपक्षीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली.

# शेकडो शिक्षक बनले बीएलओ

## परीक्षा काळात शिक्षकांवर मतदारयाद्यांचा भार

**▸विदर्भ केसरी। अमरावती**

**एप्रिलमध्ये विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा होत असताना जिल्हा परिषदेच्या शाळेतील बीएलओ असलेल्या शिक्षकांना ऐन परीक्षेच्या काळात मतदार याद्या पुनर्निरीक्षणचे (एसआयआर) काम लागल्याने शेकडो शिक्षक बीएलओ कामासाठी नियुक्त केले आहेत.सध्या एप्रिल महिना परीक्षा तसेच वर्षभरातील कामाचा विद्यार्थ्यांचा लेखाजोखा मांडण्याचा महत्त्वाचा काळ असताना शिक्षकांना बीएलओ म्हणून नियुक्त करण्यात आले.**



विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा, दैनंदिन अध्यापन व दैनंदिन कामे, दाखलपात्र याद्या, निकालपत्रक आदी कामे कोण करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. एप्रिल महिन्यात प्रत्येक शाळांमध्ये ऐन परीक्षेच्या काळात पटपडताळणी होणार आहे. त्यामुळे मतदारयाद्यांच्या कामासह गैरहजर विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी शिक्षकांना दारोदारी फिरावे लागत आहे. शालेय कामाशिवाय इतर शाळाबाह्य कामांच्या अतिरिक्त बोजामुळे शिक्षक मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत.बीएलओ व इतर अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षक बीएलओ कामात व्यस्त असल्याने शालेय नियोजन कोलमडले असून विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर त्याचा विपरित परीणाम झाला आहे. त्यामुळे विद्यार्थाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न पालक विचारत आहे. तसेच येत्या भर उन्हात ४ थी व ७ वीची शिष्यवृत्ती परीक्षा होणार आहे. सध्या ११ एप्रिलपासून १ ते ९ वर्गाच्या वार्षिक परीक्षा सुरू आहे.त्यात शिक्षकाकडे बीएलओचे काम आल्यामुळे ते त्रस्त झाले आहे.

### वाढली डोकेदुखी

**■ मतदार यादीतील नावांची जुळवणी म्हणजेच मॅपिंग २००२ च्या मतदार यादीतील नातेवाइकांच्या नावाशी जुळवणे, मॅपिंग करणे हे अतिशय किचकट, वेळखाऊ काम आहे. अनेक आदिवासी, अशिक्षित मतदारांना माहिती सांगता येत नसल्याने मॅपिंगची टक्केवारीत वाढ होत नसल्याचे चित्र आहे. ऐन परीक्षाकाळात शाळेचे कामकाज न करता मतदारयाद्यांचे काम करण्यासाठी शिक्षकांना पूर्ण वेळ द्यावा लागत आहे.**



## महामानवाला अभिवादन

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाला आपण जेवढे अभिवादन करू तेवढे कमी आहे. महामानवाने संविधान लिहिले आणि देश बदलवला, सर्व भेद संपवले. तसेच सर्व भेद संपवण्याचे काम संविधानाने केले आहे. भारत प्रगती करत आहे कारण भारताला सर्वाधिक चांगले संविधान दिले आहे. जगात सर्वांत मोठ्या प्रमाणात जयंती कोणाची होत असेल तर ती बाबासाहेब आंबेडकर यांची होते.

भगवान बुद्ध यांनी 'अत् दीप भव:' हा संदेश दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताच्या अर्थकारणाला जी दिशा दिली ती सर्वांत महत्त्वाची आहे. भारतात एक सेंट्रल बँक असली पाहिजे, असे बाबासाहेब यांनी सांगितले होते. आपल्या चलनाचे सिल्व्हर कोट संपवून गोल्डन कोट सुरू केले पाहिजे, म्हणून रिझर्व्ह बँक स्थापन झाली. याची मूळ कल्पना ही बाबासाहेब यांची होती. असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंती महोत्सव दिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बोलताना सांगितले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे राज्यघटनेचे निर्माते होते, तसेच ते माणुसकीचेही निर्माते होते. त्यांनी प्रथम निवडणूक लढवली त्यात त्यांचे निवडणूक चिन्हही माणूस होते. चवदार तळ्याच्या एका चळवळीने देशात सामाजिक क्रांती केली, जगात अनेक ज्ञानी, विचारवंत झाले. मात्र बाबासाहेबांनी त्यांचे ज्ञान स्वत:साठी न वापरता शोषित, वंचित, दीन-दलितांच्या उद्धारासाठी वापरले आहे. संविधान हा आपल्या देशाचा पाया आहे. आज एक सर्वसामान्य व्यक्ती देशाच्या उच्च स्थानी विराजमान होतो. आमच्या सुनेत्राताई उपमुख्यमंत्री होतात.. ही संविधानाची देण आहे. आमच्या सरकारचा डीएनए हा बाबासाहेब असल्याचे म्हटले तर वावगे ठरणार नाही, अशी प्रतिक्रियाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना दिली.

**■ मातीचे सोने झाले, भीमा तुझ्यामुळे, जीवनात आनंद झाला भीमा तुझ्यामुळे, चवदार तळ्याचे ओंजळभर पाणी पिले आणि क्रांती झाली, बाबासाहेबांनी दिलेले संविधान हाच आपला आत्मा आहे. आम्ही इथे बसलो ते संविधानाची शपथ घेऊन बसलो. अदिवासी महिला राष्ट्रपती होतात, आणि मी शेतकरी कुटुंबातला मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री झालो ते बाबासाहेब यांच्यामुळे. भीमाची लाडकी लेक ज्योती वाघमारे संसदेत पोहोचली, बाबासाहेबांचा विचार हाच आमच्या सरकारचा डीएनए आहे, असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.**

# काय मंडळी ? मी येतोय दर्यापुरात !

## आपणही या, मकरंद अनासपुरे : गरजू महिलांना देणार मोफत शिलाई मशीन

**▸विदर्भ केसरी। दर्यापूर**

'दैनिक विदर्भ केसरी'च्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त येत्या २२ एप्रिल रोजी दर्यापूर येथील कन्या शाळेच्या मैदानावर एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण लोकप्रिय मराठी अभिनेते मकरंद अनासपुरे हे राहणार असून, त्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या सोहळ्यात सामाजिक बांधिलकी म्हणून गरजू महिलांना मोफत शिलाई मशीनचे वाटपही करण्यात येणार आहे.

वर्धापन दिनानिमित्त राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत अबुजर अकील घानिवाले यांच्या वतीने गोरगरीब महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई मशीन देण्यात येणार आहेत. या सामाजिक उपक्रमाचे सध्या तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाला राजकीय क्षेत्रातील दिग्गज नेत्यांसह माजी मंत्री, आमदार आणि खासदारांचीही मांदियाळी राहणार आहे. दैनिक विदर्भ केसरीचे संपादक अमोल कंटाळे यांनी या भव्य सोहळ्याचे नियोजन केले असून संपूर्ण दर्यापूर परिसरात या कार्यक्रमाची मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. हा सोहळा केवळ



मनोरंजनात्मक न राहता त्यातून सामाजिक परिवर्तनाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे. मकरंद अनासपुरे यांच्या हजेरीमुळे दर्यापूरकरांसाठी ही एक मोठी पर्वणी ठरणार आहे. या सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विदर्भ केसरीची संपूर्ण चमू परिश्रम घेत आहे.

# 180 तरुणींचे लैंगिक शोषण आणि 350 अश्लील व्हिडिओ व्हायरल

**▸विदर्भ केसरी।**

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांचे लैंगिक शोषण केल्याच्या आणि त्यानंतर ब्लॅकमेल करून अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या संशयित आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात भाजप खासदार अनिल बोंडे यांनी संबंधित आरोपीने तब्बल 180 तरुणींचे शोषण करून त्यांचे 350 व्हिडिओ व्हायरल केल्याचा धक्कादायक आरोप केल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत ही कारवाई केली असून, या खळबळजनक प्रकरणाचा अधिक तपास सध्या सुरू आहे.

नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण ताजे असतानाच, अमरावती जिल्ह्यातही मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या तरुणाने सुमारे 200 मुलींचे लैंगिक शोषण केल्याच्या खळबळजनक आरोपाने मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली असून, न्यायालयात हजर केले असता त्याला 21 एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या धक्कादायक प्रकरणाचा अधिक तपास आता पोलिस यंत्रणेमार्फत केला जात आहे.

परतवाडा पोलिसांनी अश्लील व्हिडिओ प्रकरणी ताब्यात घेतलेला युवक एमआयएमचा कार्यकर्ता असल्याचा खळबळजनक आरोप खासदार अनिल बोंडे यांनी केला असून, हे केवळ एका व्यक्तीचे कृत्य नसून यामागे एक मोठी टोळी सक्रिय असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या टोळीने स्नॅपचॅट आणि व्हॉट्सअ‍ॅपवर ग्रुप्स तयार करून हे जाळे पसरवले असल्याचे सांगत, पोलिसांनी संबंधित आरोपींचे मोबाईल जप्त करून त्यांच्या कॉल डिटेल्सची आणि संपर्काची सखोल चौकशी करावी, अशी आग्रही मागणीही बोंडे यांनी यावेळी केली आहे.

## पुण्यात तापमानाने चाळीशी ओलांडली

पुणे: सूर्य आग ओकत असून, अंगाची लाही लाही करणाऱ्या असह्य उकाड्याने पुणेकर घामाघूम झाले आहेत. मंगळवारी (दि.१४) उपनगरांमध्ये तापमानाच्या पाऱ्याने चाळीशी ओलांडल्याचे पाहायला मिळाले. लोहगावमध्ये सर्वाधिक ४१.८ अंश सेल्सिअसची नोंद झाली. पुढील दोन दिवसात कमाल तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसने वाढ होणार असल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने दिली आहे.

दैनिक विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

!! पाहिजेत !!

**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.

**पात्रता आणि आवश्यकता:**

पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.

- **शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर**
- **आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.**
- **एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.**

**इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:**
**कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.**
**संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९**




# अकोला पुन्हा सर्वात ‘हॉट’

## ४४ अंशांचा टप्पा गाठला, विदर्भात उष्णतेची लाट

**▸विदर्भ केसरी। अकोला :**

उन्हाचा पारा चांगलाच वाढत असतांना अकोला शहर पुन्हा एकदा सर्वात ‘हॉट’ ठरले आहे. एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातच अकोला शहराने ४४ अं.से.चा टप्पा गाठला. कालच ४३.८ अं.से. तापमानासह अकोला जगात सर्वाधिक तापमानाचे शहर ठरले होते. आज तापमानात आणखी वाढ नोंदवल्या गेली.

दरवर्षी उन्हाळ्यात अकोला जिल्ह्याला तप्त उन्हाचे चटके बसत असतात. उन्हाळ्यात जिल्ह्यातील तापमानात कमालीची वाढ होते. जिल्ह्यात दरवर्षी तापमानाचे नवनवे विक्रम रचले जातात. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला ढगाळ वातावरण होते. वातावरणात बदल झाला होता. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या




आठवड्यापासून तप्त उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली. उन्हाच्या तीव्र लाटेत होरपळ होत आहे. गेल्या दोन दिवसांपासून अकोला देशातील सर्वात उष्ण शहर ठरले. त्यानंतर आज अकोला शहरातील तापमानाने ४४ अं.से.चा टप्पा देखील गाठला. नागपूर येथील हवामान विभागाने नोंदवलेल्या तापमानानुसार विदर्भात अकोला पुन्हा एकदा सर्वाधिक तापमानाचे शहर ठरले आहे.

■ **विदर्भातील सर्वच शहरांचे तापमान ४१ अं.से.च्या पार**

विदर्भातील अकोल्यासह सर्वच शहरांचे तापमान ४१ अं.से.च्या पार गेले आहे. यामध्ये अकोला ४४, अमरावती ४३.८, बुलढाणा ४१.६, चंद्रपूर ४२.२, गडचिरोली ४२.६, गोंदिया ४१.१, नागपूर ४२.२, वर्धा ४३.५, वाशीम ४२.५ आणि यवतमाळ जिल्ह्यात ४२.६ अं.से. तापमानाची नोंद १४ एप्रिलला झाली आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने १७ एप्रिलपर्यंत अकोला तसेच विदर्भातील इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यानुसार आवश्यक दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले.

### अशी घ्या काळजी

■ **नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत. उन्हात वाहने शक्यतो चालवू नये. ज्वलनशील पदार्थांपासून शक्यतो दूर राहावे. लहान मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या वाहनात तसेच पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. तहान लागलेली नसली तरी जास्तीत जास्त पाणी पिण्यात यावे. अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा, पशुधनास तसेच पाळीव प्राण्यांना छावणीत ठेवण्यात यावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी देण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# अग्रलेख

## तीच खरी आदरांजली

14 एप्रिल हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील प्रेरणादायी पर्व आहे. या दिवशी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती देशभर मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र शासन तसेच देशातील विविध संस्थांकडून त्यांच्या कार्याचा गौरव करणारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात.'विश्वरत्न', 'भारतरत्न', 'घटनाकार" आणि 'भारत भाग्यविधाता' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून विविधतेने नटलेल्या भारताला एकसंघ राष्ट्र म्हणून बांधून ठेवण्याचे ऐतिहासिक कार्य केले.त्यामुळेच त्यांच्या जयंती दिनी संपूर्ण देशात त्यांना आदरांजली व्यक्त केली जाते. काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंतची जनता आजच्या दिवशी महामानवापुढे नतमस्तक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले संविधान व त्यावर आधारित लोकशाही जोपर्यंत भारतात आहे, एकसंघ भारतासाठी कायद्याची पोलादी चौकट कायम आहे.त्यांना आदरांजली व्यक्त करताना संविधानाच्या स्वरुपात बाबासाहेबांनी दिलेल्या समानतेच्या,न्यायाच्या आणि बंधुतेच्या धाग्यात सर्व भारतीयांना गुंफण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका स्पष्ट होती. संविधान सभेत बोलताना ते म्हणाले होते, "राष्ट्र प्रथम, समाज नंतर आणि व्यक्ती त्यानंतर." स्वतः आयुष्यभर सामाजिक अन्याय सहन करूनही त्यांनी कधीही कोणाबद्दल सूडाची भावना बाळगली नाही. उलट, त्यांनी अशी राज्यघटना निर्माण केली ज्यामध्ये प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळेल. आचार्य प्र. के. अत्रे यांनी बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर लिहिलेल्या आपल्या आदरांजलीत आंबेडकरांना "जुलूमाविरुद्ध उगारलेली वज्राची मुठ" असे संबोधले आहे. ही उपमा त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे अचूक चित्रण करते. आपण बघतो, भाषा, प्रांत,जाती,अस्मिता यावरून देशात आजही अनेक आंदोलने सुरू असतात, विविध संघटना आणि राजकीय पक्ष आपापल्या भूमिका मांडत असतात.संविधानाचे वैशिष्ट्य म्हणजे संविधान भाषा,प्रांत,जाती,अस्मिता यांचे अस्तित्व मान्य करते.मात्र सोबतच राष्ट्रापुढे सर्व बाबी गौण ठरवते.विधिमंडळ,कार्यपालिका, न्यायपालिका,माध्यमे अशा सर्व स्तंभांना त्यांनी परस्पर पूरक उभे केले आहे.त्यामुळे भारतीय राज्यघटनेला पुढे ठेवूनच सर्व घटकांना आपली वाटचाल करावी लागते."भारतीय संसद, न्यायपालिका आणि कार्यपालिका या एकमेकांवर नियंत्रण व संतुलन (checks and balances) ठेवतात. कार्यपालिका राज्यघटनेनुसार प्रशासन करते, आणि या सर्वांवर माध्यमे व जनतेचे लक्ष राहते. जबाबदारीची,कार्यवाहनाची,जाणिवांची आणि दायित्वाची अशी मजबूत पोलादी साखळी घटनेच्या माध्यमातून निर्माण झाली आहे.त्यासाठी महत्त्वपूर्ण ठरले आहेत भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार. या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट बजावले आहे की या मूलभूत अधिकारांनी स्पष्ट केले, 'हा देश हा अस्मितेवर नव्हे,भावनेवर नव्हे तर सर्वसंमतीवर चालेल.' बाबासाहेब स्वतः वंचित समाजातून आले होते, पण त्यांनी फक्त मागासवर्गीयांसाठी नव्हे तर सर्व समाजासाठी न्याय व्यवस्था उभी केली. अनुसूचित जाती-जमातींसाठी आरक्षण, समान संधी,सामाजिक न्यायासाठी कायदेशीर संरक्षण त्यांनी दिले. सोबतच कोणत्याही समाजावर अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली. महामानवाला अभिवादन करताना प्रत्येक भारतीयाने ही शपथ घेणे गरजेचे आहे की, संविधान टिकले तर लोकशाही टिकेल. आणि राजकीय लोकशाही तेव्हाच टिकेल जेव्हा सामाजिक लोकशाही अस्तित्वात असेल. आपण संविधानाच्या अमृत महोत्सवी काळात आहोत. या पार्श्वभूमीवर प्रत्येक भारतीयाने संविधान समजून घेणे आवश्यक आहे.संविधानाचे पालन करणे आवश्यक आहे.आपल्या अधिकारांसोबत भारताचा नागरिक म्हणून आपली कर्तव्येही ओळखणे आवश्यक आहे. बाबासाहेबांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ, न्याय्य आणि प्रगत भारत उभा केला. जगाला वाटत होते की भारत टिकणार नाही, पण आज भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे,जगातील महाशक्ती म्हणून उदयास येत आहे. हे त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे. 14 एप्रिलच्या त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्यापुढे नतमस्तक होताना... चला भारतीय म्हणून आपण एकच संकल्प करुया...संविधानाचा सन्मान करुया, समानतेचे,बंधुत्वाचे मूल्य जपूया सर्वप्रथम एक भारतीय बनूया आणि एकसंघ भारत अधिक मजबूत करुया... हीच महामानव बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

# बाराचा ठोका अन् ‘जय भीम’चा गजर



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमीत्त नागपूर शहर निळ्या पताकांनी सजले आहे. ठिकठिकाणी निळ्या रंगांचे झेंडे, मंडप व फुलांचे हार लावण्यात आले. विविध संस्था, संघटनांचे पदाधिकारी यासाठी दिवसरात्र झटत आहेत. दीक्षाभूमी व संविधान चौक हे आकर्षणाचे मुख्य केंद्रबिंदू होते.

# यवतमाळात आज डॉ. नागेश गवळी यांचे व्याख्यान

## महात्मा फुले व डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजन : नागरिकांनी लाभ घ्यावा : येवतकर



**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

क्रांतिसूर्य महात्मा जोतीबा फुले आणि महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळ येथील लोहारा परिसरात बुधवारी १५ एप्रिल रोजी एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. सिद्धेश्वर नगर सहयोग दुर्गोत्सव मंडळ आणि सिद्धेश्वर गणेशोत्सव मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील सुप्रसिद्ध वक्ते तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ. नागेश गवळी आपले विचार मांडणार आहेत.

हा कार्यक्रम उद्या सायंकाळी ७ वाजता वाघापूर बायपासजवळील राऊत नगर, लोहारा येथील सिद्धेश्वर नगर सांस्कृतिक भवन येथे पार पडणार आहे. महापुरुषांच्या विचारांचा वारसा तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे. या प्रबोधनात्मक कार्यक्रमाला नागरिकांनी सहपरिवार आणि मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद यवतमाळ च्या महिला जिल्हाध्यक्ष सुनयना संजय येवतकर यांनी केले आहे.

### श्रोत्यांसाठी वैचारिक पर्वणी

■ **सध्या शहरात जयंती उत्सवाचे उत्साही वातावरण असून या व्याख्यानाच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचा जागर केला जाणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत असून, वाघापूर आणि लोहारा परिसरातील श्रोत्यांसाठी ही एक वैचारिक पर्वणी ठरणार आहे.**

## महिलेकडे सापडले साडेचार कोटींचे कोकेन

**▸विदर्भ केसरी।**

हजरत निजामुद्दीन – बंगळूरू दरम्यान धावणाऱ्या राजधानी एक्स्प्रेसमधून प्रवास करणाऱ्या महिलेकडे साडेचार कोटींचे ८८५ ग्रॅम कोकेन सापडल्याने शहरात खळबळ उडाली. केंद्रिय महसूल गुप्तचर संचालनालयाच्या नागपूर प्रादेशिक पथकाने अजनी रेल्वे स्थानकावरून या महिलेच्या सामानात कोकेनच्या ५० हून अधिक कॅप्सूल सापडल्या. धक्कादायक बाब म्हणजे शॅम्पूच्या बाटतीतून ही तस्करी केली जात होती. नागपुरात इतक्या मोठ्या प्रमाणात कोकेन नावाचे अंमली पदार्थ सापडण्याची ही बहुदा पहिलीच वेळ आहे. पोलीस आणि राज्य टास्क फोर्सच्या गुप्तचर यंत्रणेवर मात करत पुन्हा एकदा डीआरआयच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

## पैशासाठी अपंगाचा गळा आवळून खून

**▸विदर्भ केसरी।**

अपंगत्वामुळे वृद्ध व्यक्ती घरातले पैसे लुटताना प्रतिकार करू शकणार नाही, हा भ्रम फोल ठरत असल्याचे पाहून चौघांनी मिळून ज्येष्ठाची उशीने नाक- तोंड दाबत निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना वाडी पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आली. सहेसराम बाजीराव केवट (६०) असे खून झालेल्या अपंग व्यक्तीचे नाव आहे. केवट हे वडधामणा येथील सुराबर्डी वस्तीत कृष्णा नगर परिसरात एकटे राहत होते. ते अपंग असल्याने शासनाकडून मिळणाऱ्या मानधनावर त्यांचा उदरनिर्वाह सुरू होता. ही बाब मारेकऱ्यांना माहित होती. रविवारी मध्यरात्री एकच्या वाजताच्या सुमारास केवट हे घरात झोपले होते. विलास सुभाष चौधरी (२७), जितेंद्र संतोष वगारे (२५) आणि प्रविण ढिल्लन चव्हाण (२५, सर्व रा. सुराबर्डी वस्ती, वडधामणा) यांनी संगनमत करून केवट यांच्या घरात प्रवेश केला. यावेळी केवट यांनी विरोध केल्याने आरोपींनी उशीने तोंड दाबून तसेच गळा आवळून त्यांची हत्या केली.

## सेल्फीच्या मोहात विहिरीमध्ये बुडाला तरुण

**▸विदर्भ केसरी।**

एका क्षणाच्या बेफिकीरीने आयुष्य संपुष्टात येते, याचा प्रत्यय देणारी हृदयद्रावक घटना हिंगणा परिसरात घडली. सेल्फी काढण्याच्या मोहात १८ वर्षीय तरुणाचा विहिरीत पडून मृत्यू झाला. अनिकेत उत्तमराव सोनटक्के (रा. भारतमाता नगर, न्यू नरसाळा रोड, हिंगणा) असे या दुर्दैवी तरुणाचे नाव आहे. अनिकेत हा सकाळी मित्रांसोबत मौजा वेळाहरी येथील बावडी विहिरीजवळ फिरण्यासाठी गेला होता. आनंदाच्या क्षणांना कॅमेऱ्यात टिपण्याच्या उत्साहात तो विहिरीच्या कडेला उभा राहून फोटो काढत होता. याचदरम्यान त्याची चप्पल पाण्यात पडली. ती काढण्याच्या प्रयत्नात तोल जाऊन अनिकेत विहिरीत कोसळला. काही क्षणांतच तो पाण्यात बुडाला.

## ७ दुचाकींसह सराईत वाहनचोर जाळ्यात

**▸विदर्भ केसरी।**

तहसील पोलीस हद्दीतून चोरीला गेलेल्या किरणकुमार शाहू यांच्या दुचाकीचा समांतर तपास करत असताना गुन्हे शाखा पथक तीनेने लखपती बस्ताराम फेंडर (३१, रा. वाराशिवनी, बालाघाट) यास ताब्यात घेतले. विचारपुस केली असता, त्याने वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. सखोल तपास केला असता त्याने यापूर्वीही तहसील, गणेशपेठ, रेल्वेस्थानकासह गोंदियातून दोन अशा ६ दुचाकी चोरल्याचे सांगीतले. त्याच्या ताब्यातुन पोलिसांनी चोरलेल्या सर्व ७ दुचाकी वाहने किंमती जप्त केली.

## पाणी भरताना महिलेचा दुर्दैवी मृत्यू

वणी : शहरातील शास्त्रीनगर परिसरात आज सकाळी अत्यंत दुर्दैवी घटना घडली. विजेचा धक्का लागून एका महिलेचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत महिलेचे नाव सौ. छाया नंदकिशोर घुले (वय ३५, रा. शास्त्रीनगर, मोक्षधामजवळ, वणी) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्या आपल्या घरात मोटारद्वारे पाणी भरत असताना अचानक विजेचा जोरदार धक्का बसला. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.


दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू

संपूर्ण विदर्भात प्रतिनिधी पाहिजेत !

विदर्भातील निर्भीड, निष्पक्ष आणि जनतेच्या प्रश्नांवर थेट आवाज उठवणारे अग्रगण्य दैनिकदैनिक विदर्भ केसरी साठी

प्रत्येक जिल्हा, तालुका व प्रमुख शहरांमध्ये वार्ताहर / प्रतिनिधी / ब्युरो चीफ / उपसंपादक जाहिरात प्रतिनिधी तात्काळ पाहिजेत.

- पत्रकारितेची आवड असलेले
- सामाजिक व राजकीय घडामोडींची जाण असलेले
- स्वतःचे दुचाकी वाहन व मोबाईल असलेले
- अनुभवी तसेच नवोदित इच्छुकांना संधी

आपल्यात लेखनकौशल्य, धाडस आणि समाजासाठी काम करण्याची जिद्द असेल तर ही सुवर्णसंधी आहे!



इच्छुकांनी आपला बायोडाटा व फोटो खालील नंबरवर पाठवावा. (WhatsApp वर अर्ज स्वीकारले जातील)

संपर्क

संपर्क: 9975532291/9096945629
Gamil. vidarbhkesari@gmail.com
Web- www.vidarbhakesari.com



दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist. Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code MAHMAR51049 l Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291 9096945629



■ विश्व हिंदू परिषद समाजिक समरसता अभियान अंतर्गत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आयोजित लंगर सेवेत नगराध्यक्ष प्रियदर्शिनी उईके.

**महत्त्वाचे**



## मोहदरी येथे अभिनव पद्धतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**▸विदर्भ केसरी। मोहदा प्रतिनिधी**

मोहदरी : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त मोहदरी गावात यंदा अनोख्या व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पद्धतीने जयंती साजरी करण्यात आली. गावातील मुख्य चौकात बाबासाहेबांच्या प्रतिमेचे फलक अनावरण करण्यात आले. यानंतर पारंपरिक रॅली व इतर खर्चिक कार्यक्रमांना फाटा देत, गावातील माजी विद्यार्थी संघ व युवक मंडळाच्या पुढाकारातून जिल्हा परिषद शाळेतील सुमारे ७० विद्यार्थ्यांना जवळपास १४,००० रुपयांच्या शालेय बॅगचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे जयंतीला सामाजिक उपयुक्ततेची जोड मिळाली.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित उत्स्फूर्त भाषणे सादर केली. मुख्य प्रबोधनपर मार्गदर्शन शाळेतील शिक्षक कैलास मडावी यांनी केले. या प्रसंगी गावचे सरपंच बाबारावजी धुर्वे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रमोद चव्हाण, रामभाऊ येलोरे, नारायणजी मडावी, धुमाळे सर, वागदरे सर तसेच मुख्याध्यापक वरुडकर सर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बॅगचे वाटप करण्यात आले. सदर उपक्रमासाठी गावातील युवकांनी पुढाकार घेत निधी संकलन केले होते. यात आशु संकेवार, विकास सोयाम, आदित्य रायमल, सुरज बुट्टे, अमोल मोहरले, प्रेम मडावी आदींचा सहभाग होता. या वेळी गावातील अंगणवाडी सेविका, आशा सेविका, मदतनीस तसेच शालेय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजाभिमुख उपक्रमातून जयंती साजरी केल्याबद्दल या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## अवैध रेती चोरीवर कारवाई

**▸विदर्भ केसरी।**

पोफाळी पोलिसांनी डोंगरगाव शिवारात अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई केली आहे. आरोपी शेख फारुख आणि सय्यद मुसबीर हे विनापरवाना अडीच ब्रास रेती चोरून नेत असताना रंगेहाथ पकडले गेले. पोलिसांनी ५ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर आणि २५ हजार रुपयांची रेती असा एकूण ५.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोफाळी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

## शेतीचे साहित्य चोरीला

घांटंजी : तालुक्यातील रामनगर (टाकळी) शेतशिवारातून अज्ञात चोरट्याने शेतीचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी विवेक चौधरी यांच्या शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी लावलेली ३ हजार रुपयांची मोटार आणि ३६ हजार रुपये किमतीची केबल, असा एकूण ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने लंपास केला. याप्रकरणी पारवा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून शोध सुरू आहे.

# बाबासाहेबांना अभिमानपूर्वक मानवंदना

### संविधान चौकात भीमगर्जना पथकाकडून उपक्रम :

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

**यवतमाळ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील संविधान चौक येथे त्यांच्या स्मारकासमोर भीमगर्जना ढोल-ताशा व ध्वज पथकाच्या वतीने अभिमानपूर्वक मानवंदना अर्पित करण्यात आली.**

१३ एप्रिल रोजी सायंकाळी तसेच १४ एप्रिल रोजी सकाळच्या सुमारास पार पडलेल्या या मानवंदना कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला. ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणाबाजीत वातावरण भारावून गेले होते. विशेष म्हणजे, भीमगर्जना ढोल-ताशा व ध्वज पथक हे यवतमाळ जिल्ह्यातील बहुजन समाजाचे पहिले असे पथक असून, सामाजिक चळवळीला नवी दिशा देणारे ठरत आहे.या कार्यक्रमाचे नेतृत्व पथकाचे संचालक तथा वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष, नगरपालिकेचे गटनेते व नगरसेवक डॉ. नीरज वाघमारे यांनी केले. यावेळी उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या मूल्यांची जपणूक करत समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला.



## तुमच्या कर्तुत्वाला सलाम....

### नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके




**▸विदर्भ केसरी। यवतमाळ,**

तुम्ही अग्निशमन कर्मचारी हे यवतमाळकरांची ताकत आहे. तुमच्या अहोरात्र केलेल्या कर्तव्यामुळेच नागरिकांचे प्राण वाचतात. त्यामुळेच तुमच्या कर्तुत्वाला सलाम..असे प्रतिपादन ॲड. प्रियदर्शनी अशोक उईके यांनी केले.

येथील आर्णी मार्गावरील अग्निशमन केंद्रावर अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग, नगरपरिषद यवतमाळ यांच्या वतीने दि. १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सेवा सप्ताहाचे मंगळवारी (ता.१४) नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या हस्ते थाटात उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्या कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी उपनगराध्यक्ष दत्ताभाऊ कुळकर्णी, विरोधी पक्षनेत्या वैशाली सवाई, नगरसेवक प्रमोद बगाडे, नगरसेवक बिपीन चौधरी, अग्निशमन अधिकारी विनोद खरात, संगणक अभियंता नागेश कपाटे, रवी तायडे, उमेश बाजोरीया, विपीन रहांगडाले, हेमंत डोंगरे, निलेश बिसेन, सागर वाढई, अनुराग फुरसूले, नितीन जगताप, मनीष पवार, धिरज राठोड, सुरज राठोड, प्रमोद तिडके, श्रावण चव्हाण, राहुल यादव, निखिल पाठक आदींची उपस्थिती होती.

अग्निशमन सेवेत कार्य करतांना प्राणाची आहुती देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ तसेच नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने हा सप्ताह दरवर्षी केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा केला जातो.

## ५ आदिवासी शेतकऱ्यांचा आत्महत्येचा प्रयत्न

### प्रशासनाच्या उदासिनतेचा कडेलोट: राजुरा उपविभागीय कार्यालयातील प्रकार



**प्रशासकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

**■ एकीकडे सरकार शेतकरी हिताच्या गप्पा मारत असताना, दुसरीकडे स्वतःच्या हक्कासाठी १५ वर्षे कार्यालयाचे उंबरे झिजवणाऱ्या आदिवासी बांधवांना मृत्यूला कवटाळण्याची वेळ का येते? हा गंभीर प्रश्न या घटनेने उपस्थित केला आहे. कंपनीचे हित जपले जात असून गरिबांच्या जमिनी कवडीमोलाने हडपल्या जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून होत आहे. जर वेळीच या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा निघाला असता, तर ही दुर्दैवी वेळ आली नसती. आता तरी प्रशासन जागे होऊन या पीडित शेतकऱ्यांना न्याय देणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

**▸विदर्भ केसरी। कुणाल गायकवाड -:**

गेल्या १५ वर्षांपासून आपल्या हक्काच्या जमिनीसाठी लढा देणाऱ्या कुसुंबी (ता. कोरपणा) येथील पाच आदिवासी शेतकऱ्यांनी अखेर टोकाचे पाऊल उचलले. राजुरा येथील उपविभागीय अधिकारी (SDO) कार्यालयातच या शेतकऱ्यांनी विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. प्रशासकीय अनास्था आणि न्यायासाठी होणारी फरफट याला कंटाळून शेतकऱ्यांनी हे पाऊल उचलल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

कोरपणा तालुक्यातील कुसुंबी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी माणिकगड सिमेंट (अल्ट्राटेक कंपनी) च्या खाणीसाठी संपादित करण्यात आल्या होत्या. मात्र, गेल्या दीड दशकापासून या जमिनींचा प्रश्न प्रलंबित आहे.

प्रशासनाकडे वारंवार दाद मागूनही केवळ आश्वासने मिळत असल्याने संतप्त झालेल्या पाच शेतकऱ्यांनी सोमवारी राजुरा उपविभागीय अधिकारी रवींद्र माने यांच्या कार्यालयात धाव घेतली आणि तिथेच विष प्राशन केले. संपादित जमिनीचा प्रचलित दराप्रमाणे तात्काळ मोबदला मिळावा. जर मोबदला देणे शक्य नसेल, तर आमच्या हक्काच्या जमिनी आम्हाला परत करण्यात याव्यात. गेल्या १५ वर्षांपासून सुरू असलेला 'फाईल'चा खेळ थांबवून कायमस्वरूपी तोडगा काढावा विष प्राशन केल्याची माहिती मिळताच राजुरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पाचही शेतकऱ्यांना तातडीने राजुरा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी




### संघर्षातून सफलतेकडे गेलेल्या भूमिपुत्रांचा केला गौरव

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतीनिधी/**

शुध्द विचारातुन सशक्त समाजाची निर्मिती होत असते आणि शुध्द विचार चांगल्या आचरणातून येत असतात आज समाजात चांगले आचरण आणि विचारांचा प्रभाव निर्माण करणे हे बाबासाहेबांच्या उद्देशाचा प्रचार व प्रसार आम्ही जयंतीनिमित्त केला पाहिजे.असे उदगार मा.भगवान हनवते (बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क, जिल्हाप्रभारी) यांनी समता बुध्द विहार हुडी बु.आयोजित भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135व्या जयंती कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनात मांडले. समता बुध्द विहार समिती व भीम योध्दा ग्रृप हुडी बु.यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त "संघर्षातुन सफलतेकडे जाणाऱ्या विचारांचा सन्मान अशा अनोख्या विचारांची जयंती साजरी करून हुडी गावाच्या मातीशी नाळ जुळलेल्या सेवा निवृत्त व कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचा भव्य सत्कार व सन्मान कार्यक्रम घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटक मा.प्रकाश कांबळे (शिक्षक जि.प.शाळा हुडी बु) यांनी आपल्या मार्गदर्शनात समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या संविधानीक मुख्य तत्वावर आधारित समाजाची निर्मिती होणे आज काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक बंडुभाऊ गंगावणे (बुध्दिस्ट इंटरनॅशनल नेटवर्क जिल्हाध्यक्ष) यांनी केले, कार्यक्रमाचे स्वागतअध्यक्ष संतोष कांबळे (मा. सरपंच)हे होते तर कार्यक्रमाला उपस्थित दिनेश हरणे (पो.पाटील) भारत कांबळे तंटामुक्ती अध्यक्ष, महानंदा भालेराव सरपंच हुडी,वानरे सर,जि.प.शाळा हुडी,शंकर कऱ्हे, अध्यक्ष गि.म.आश्रम शाळा हुडी, प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन समता बुध्द विहार आणि भीम योध्दा ग्रृप हुडी बु.यांनी केले तर आभार प्रदर्शन रोहित कांबळे यांनी केले.कार्यक्रमाला गावातील सर्व गावकरी समाज बांधव व महिला यांनी मोठ्या उत्साहात भाग घेतला होता.

## मोटार सायकल चोरीचा गुन्हा अवघ्या १२ तासात उघड

**▸▸| स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांची कामगिरी**

**▸विदर्भ केसरी। पुसद प्रतिनिधी**



पोलीस स्टेशन पुसद शहर हददीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून दिनांक 05/04/2026 रोजी ॲक्टीव्ही मोटार सायकल चोरीस गेल्याने त्याबाबत दिनांक 12/04/2026 रोजी पुसद शहर अप क्रमांक 271/2026 कलम 303(2) भान्यास अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. मा. पोलीस निरीक्षक सा स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी जिल्हयात मोटार सायकल चोरी मधील आरोपी यांचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ कॅम्प पुसद पथकांने तात्काळ सदर गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाचे निरीक्षण करुन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करुन गोपनिय बातमीदार यांच्याकडून माहीती काढण्याचा प्रयत्न करीत असतांना दिनांक 13/04/2026 रोजी नमूद पथक पुसद शहर हददीत मोटार सायकल चोरी बाबत गोपनिय माहीती व गुन्हयातील चोरीस गेलेली मोटार सायकल शोध कामी रवाना झाले असता त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, नवीन पुसद येथील इसम नामे-रामदास ऊर्फ बाळा देविदास कांबळे यांने गेले 05 ते 06 दिवसापुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून एक ॲक्टीव्ही मोटार सायकल चोरी केली असून ती त्याचे ताब्यात आहे तसेच तो ॲक्टीव्हा मोटार घेवून मच्छी मार्केट पुसद येथे थांबला आहे अशी गोपनिय माहीती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी रवाना होवून सदर ठिकाणी एक इसम ग्रे रंगाची स्कूटी घेवून उभे असलेल्या इसमांना ताब्यात घेवून त्यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांची नामे 1) रामदास ऊर्फ बाळा देविदास कांबळे वय 30 वर्ष, रा.नवीन पुसद ता. पुसद जि.यवतमाळ असे सांगितले त्यावेळी ताब्यातील MH-29-CH-0141 ही ग्रे रंगाच्या ॲक्टीव्ही DLX (स्कूटी) मोटार सायकलच्या कागदपत्राची मागणी केली असता सर्वप्रथम उडवा-उडवीचे उत्तरे देवून कोणत्याही प्रकारचे कागदपत्र नसल्याचे सांगितल्याने पोलीस कौशल्याचा वापर करुन त्यास विश्वासात घेवून विचारपूस केली असता सदरची ॲक्टीव्ही DLX (स्कूटी) मोटार सायकल गेले 05 ते 06 दिवसापुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पुसद येथून चोरी केल्याचे कबूल केल्याने ॲक्टीव्ही DLX (स्कूटी) गाडीचे चेसीस क्रमांक व इजिन क्रमांकाची पाहणी केली असता पोलीस स्टेशन पुसद शहर अप क्रमांक 271/2026 कलम 303(2) भान्यास मधील चोरीची असल्याची खात्री झ गाल्याने गुन्हयातील चोरीची मोटार सायकल ॲक्टीव्ही DLX (स्कूटी) क्रमांक MH-29-CH-0141 मोटार सायकल किंमत 50000/- मुददेमाल जप्त करुन ताब्यात घेवून नमूद इसम 1) रामदास ऊर्फ बाळा देविदास कांबळे वय 30 वर्ष, रा.नवीन पुसद ता. पुसद जि. यवतमाळ यास पुढील तपास कामी पोलीस स्टेशन पुसद शहर यांच्या ताब्यात दिले.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. कुमार चिंता (भा.पो.से) सा. मा.अपर पोलीस अधीक्षक यवतमाळ श्री. अशोक थोरात (म.पो.से) सा तसेच मा. सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. हर्षवर्धन बी.जे सा, मा.पोलीस निरीक्षक श्री. सतीश चवरे स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांचे मार्गदर्शनात स.पो.नि. धिरज बांडे, पोउपनि/शरद लोहकरे, सफौ/मुन्ना आडे, पोहवा/संतोष भोरगे, पोहवा/तेजाब रणखांब, पोहवा/सुभाष जाधव, पोहवा/कुणाल मुंडोकार, पोहवा/रमेश राठोड, पोशि/सुनिल पंडागळे, चापोउपनि रविंद्र शिरामे, पोशि/राजेश जाधव सर्व नेम-स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# यवतमाळात निमाकॉन–२०२६ थाटात संपन्न

### ३०० आयएसएम डॉक्टरांचा सहभाग

**▸विदर्भ केसरी।यवतमाळ**




यवतमाळ : नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन (निमा) यवतमाळ शाखेतर्फे आयोजित 'निमाकॉन–२०२६' ही एकदिवसीय वैद्यकीय परिषद रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता धामणगाव रोड येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात उत्साहात पार पडली. या परिषदेत जिल्ह्यातील सुमारे ३०० आय.एस.एम. डॉक्टरांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निमा यवतमाळचे अध्यक्ष डॉ. विजय अग्रवाल होते. प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री पुरस्कारप्राप्त सुभाषजी शर्मा, निमा महाराष्ट्र राज्य शाखेचे अध्यक्ष डॉ. राजू ताटेवार, वरिष्ठ उपाध्यक्ष डॉ. मंगेश हातगांवकर, निमा सेंट्रल कौन्सिलचे विधी सल्लागार डॉ. नितीन कोथळे, निमा प्रोक्टॉलॉजी सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आलोक गुप्ता तसेच निमाकॉन–२०२६ चे प्रकल्पाधिकारी डॉ. मनीष सदावर्ते उपस्थित होते.

मंचावर निमा यवतमाळचे सचिव डॉ. नोव्हेश कोल्हे, कोषाध्यक्ष डॉ. आदित्य अढाऊकर, निमा वुमेन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ. मंगला निकम, सचिव डॉ. कविता बोरकर, कोषाध्यक्ष डॉ. शिप्रा राठोड, निमा आयुर्वेद फोरमचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश जयस्वाल, सचिव डॉ. योगेश दुद्दलवार, कोषाध्यक्ष डॉ. पंकज दिडपाये तसेच निमा स्टुडंट्स फोरमचे अध्यक्ष डॉ. श्रीरंग उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मनीष सदावर्ते यांनी केले.

निरंतर वैद्यकीय शिक्षण कार्यक्रमांतर्गत शहरातील नामांकित तज्ज्ञांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यात हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सतीश चिरडे, जनरल सर्जन डॉ. अमोल देशपांडे, पोट व यकृत रोगतज्ज्ञ डॉ. हितेश दुधे, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. विनोद जाधव तसेच जनरल फिजिशियन व हृदयविकारतज्ज्ञ डॉ. सागर गोस्कुलवार यांनी मार्गदर्शन केले. तसेच मेडिको-लीगल विषयांवर चर्चा सत्रात डॉ. नितीन कोथळे यांनी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला रंगारंग स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लक्ष्मीनिवास सोनी, डॉ. अमोल दिवाणे, डॉ. मनोज बरलोटा, डॉ. मधुरा सदावर्ते आणि डॉ. कल्पना बायस यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. नोव्हेश कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विविध कार्यसमितीतील निमा सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. उपस्थित डॉक्टरांना सहभाग प्रमाणपत्र वाटप करून परिषदेला सांगता करण्यात आली.

## यवतमाळमध्ये खुनाचा गुन्हा उघड; दोन आरोपी अटकेत

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

शहर पोलीस ठाणे हद्दीत घडलेल्या खुनाच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ यांच्या विशेष पोलीस प्रेसनोटनुसार करण्यात आली.

प्राप्त माहितीनुसार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे पवन शंकरराव तडसे (वय २८) यांनी तक्रार नोंदविली. ते रस्त्याने जात असताना एका अनोळखी व्यक्तीने जवळील मैदानात एका मृतदेहाबाबत माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार घटनास्थळी गेले असता सुमारे २५ ते ३० वर्षे वयोगटातील एका अनोळखी तरुणाचा मृतदेह आढळून आला. तपासात संबंधित तरुणाच्या पाठ, पोट, कंबर, गळा व हातावर धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

या प्रकरणी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे गुन्हा क्र. २८०/२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान मृत व्यक्तीची ओळख संतोष टेकाम, रा. लाडखेड हल्ली मुक्काम पोस्टल ग्राउंड, यवतमाळ अशी पटली. तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे तपासात दोन आरोपींची नावे समोर आली. त्यानुसार पोलिसांनी तुषार विजय पोटफोडे(वय १९, रा. पाटीपुरा, यवतमाळ) आणि सम्राट बळीराम मेश्राम (वय १९, रा. पाटीपुरा, यवतमाळ) यांना ताब्यात घेऊन अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व पोलीस निरीक्षक सतीश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. या पथकात मनिष गावडे, उपनिरीक्षक गजानन राजमल, अजय डोळे, रमेश पाली, योगेश डागर, रितराज मेढे, आकाश सूर्यवंशी, सुनील पेठे व वेदांत होले यांच्यासह इतर पोलिस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

महत्त्वाचे



## अनसिंगच्या ढगे बंधू फार्मर प्रोड्युसर कंपनीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**▶विदर्भ केसरी। अनसिंग:**

वाशिम जिल्ह्यातील अनसिंग येथील प्रयोगशील शेतकरी कुंडलिक पिराजी ढगे आणि त्यांच्या सुपुत्रांनी कृषी क्षेत्रात एकत्र येत 'ढगे बंधू फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड' च्या माध्यमातून एक यशस्वी आदर्श निर्माण केला आहे. या कंपनीच्या कार्याची पाहणी करण्यासाठी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी नुकतीच शंभू ऋषी संस्थान रोडवरील संतोष कुंडलिक ढगे यांच्या शेतातील प्रकल्पाला भेट दिली. या फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या अंतर्गत 'सात्विक दूध डेरी व दूध संकलन केंद्र' यशस्वीरित्या चालवले जाते. केवळ दूध संकलनच नव्हे, तर दुधावर प्रक्रिया करून दर्जेदार पदार्थांची निर्मिती करण्यावर या कंपनीने भर दिला आहे. यामध्ये पेढा, बासुंदी, खवा, आईस्क्रीम, तूप, पनीर, कुल्फी, दही आणि ताक यांसह दुधापासून बनणारे अनेक पदार्थ अत्यंत आधुनिक पद्धतीने तयार केले जातात. या सर्व पदार्थांना मार्केटमध्ये मोठी मागणी असून, त्यांची यशस्वी विक्री केली जाते. कुंडलिक पिराजी ढगे व त्यांच्या मुलांनी मिळून उभारलेल्या या स्टार्टअपमुळे स्थानिक पातळीवर रोजगाराचा मोठा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे. या प्रोड्युसर कंपनीमध्ये अनेक तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून, ग्रामीण अर्थव्यवस्थेला यामुळे नवी गती मिळाली आहे. जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रकल्पाला भेट दिली असता, त्यांनी दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मिती प्रक्रियेची आणि साठवणूक व्यवस्थेची बारकाईने पाहणी केली. एका शेतकरी कुटुंबाने एकत्र येऊन कंपनीच्या माध्यमातून इतका मोठा विस्तार केल्याबद्दल त्यांनी ढगे परिवाराचे विशेष कौतुक केले. "शेतकऱ्यांनी उत्पादक ते उद्योजक होणे ही काळाची गरज आहे," असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.या भेटीमुळे अनसिंग परिसरातील शेतकरी आणि युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, ढगे बंधूंच्या या उपक्रमाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. याप्रसंगी महसूल व कृषी विभागाचे अधिकारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जुन्या वादातून चाकूने हल्ला

**▶विदर्भ केसरी।**

यवतमाळच्या नेताजी नगर परिसरात जुन्या वादातून एका व्यक्तीवर चाकूने हल्ला करण्यात आला. फिर्यादी विजय वानखडे यांच्या ओठावर आरोपी किशोर शिवनकर व गजू शिवनकर यांनी चाकूने वार करून जखमी केले आणि जीवे मारण्याची धमकी दिली. १२ एप्रिल रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादीच्या तक्रारीवरून लोहारा पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## बांधकामाच्या वादातून मारहाण

**▶विदर्भ केसरी।**

बाभुळगाव तालुक्यातील खर्डा येथे घरासमोर बैलाचा कोठा करण्याच्या वादातून एका ६० वर्षीय वृद्धाला काठीने मारहाण करण्यात आली. फिर्यादी गजानन भारती यांनी आरोपी विलास केडतकर याला ग्रामपंचायतीच्या जागेत बांधकाम करण्यास विरोध केला असता, आरोपीने त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना शिवीगाळ करून जखमी केले. याप्रकरणी बाभुळगाव पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला

# जग बदलणारा बापमाणूस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर!

### गोपाल भिसडे : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कोकलगाव येथे उत्साहात साजरी

**▶विदर्भ केसरी। वाशिम :**

-दि. 13 एप्रिल 2026 वार सोमवार सुप्रसिद्ध व्याख्याते गोपाल भिसडे यांचे कोकलगाव येथे व्याख्यान संपन्न झाले यावेळी गोपाल भिसडे म्हणाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजन समाजाला ज्ञानाचा प्रकाश दाखवून वैचारिक गुलामगिरीतून मुक्त करण्याचे ऐतिहासिक कार्य केले. देशात स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेची बीजे रोवत त्यांनी सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, आणि अज्ञान व अंधश्रद्धेच्या जोखडात अडकलेल्या समाजाला एक नवी दिशा दिली त्याच्या या कार्याने आज बहुजनांच्या जीवनात सोन्याचे दिवस आले आहे,




बाबासाहेब आंबेडकर यांनी महिला, कामगार, विध्यार्थी, समाजातील प्रत्येक घटकासाठी काम केले,व बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली करून त्यांना आपल्या भारतीय संविधानाच्या माध्यमातून मूलभूत हक्क आणि मूलभूत अधिकार, कर्तव्य बहाल केले, समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थान मिळवून दिले. समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांविरुद्ध प्रबोधनाची मोठी चळवळ त्यांनी उभी केली. शेतकरी, कष्टकरी, महिला आणि उपेक्षित बांधवांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देत त्यांच्यावरील अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहत त्यांना संघर्षाचे बळ दिले. स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा खरा इतिहास बाबासाहेबानी लेखणीने देशभरात पोहचवीला आपल्या पत्राची सुरुवात जय शिवराय नावाने करत,मनुस्मृती नावाची विषारी पुस्तक जाळून राज्यघटना बहाल केली, त्यातूनच पीडित समाजाला स्वाभिमान आणि सन्मानासाथी लढण्याची ऊर्जा दिली.

त्यांनी देशाला विज्ञानवादी विचार दिला, ज्याने समाजातील पीडित आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठीचा मार्ग मोकळा केला. आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी समर्पित करणाऱ्या या महामानवाचा वारसा पुढे नेणे हीच काळाची गरज आहे. असे गोपाल भिसडे यांनी दी. 13 एप्रिल रोजी. कोकलगाव येथे व्याख्यानाच्या निमित्त आपले विचार मांडले, बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांचे हे क्रांतिकारी विचार समाजात अविरत रुजविण्याचा निर्धार आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वजण करूया! असाही संदेश उपस्थित ग्रामस्थ यांना देऊन प्रभोधनाची मांदिअळी घडवून आणली, यावेळी कोकलगाव येथे बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते

## उपजिल्हाधिकाऱ्यांनी २४ तासांत खुलासा मागितला

### दै. विदर्भ केसरीचा दणका!

**▶विदर्भ केसरी। संघरतन सरदार**



विदर्भ केसरी
अंजनगाव पंचायत समितीत मनरेगाचा बोजवारा
मनरेगाचे काम थंडावले जिल्ह्याचे अधिकारी देतील का लक्ष
09 Apr 2026 - Page 4 | www.vidarbhkesari.com
Powered by softisky | 9764331134

अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत एकूण ४९ ग्रामपंचायतींमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना मोठ्या प्रमाणावर राबवल्या जात आहेत. "गावातच काम, गावातच दाम" या उपक्रमांतर्गत विहिरी, पांधन रस्ते, शेततळे, फळबाग, वृक्षलागवड, घरकुल, गुरांचे गोठे अशा योजनांचा समावेश आहे. मात्र, या योजनांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना कागदपत्रांची पूर्तता करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

ग्रामसेवक, रोजगार सेवक, एपीओ, पीटीओ यांच्याकडे फाईल्स दिल्यानंतर त्या पंचायत समिती स्तरावरच प्रलंबित राहतात. लाभार्थ्यांना वारंवार चकरा मारूनही कामांमध्ये कोणतीही गती दिसून येत नाही. तालुक्यात "जवळील" लाभार्थ्यांची कामेच जलद होतात, अशी चर्चा रंगत असून सर्वसामान्य नागरिक मात्र प्रतीक्षेत आहेत. मनरेगा विभागातील कामांच्या जबाबदारीबाबतही कार्यकर्त्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. अधिकारी "हे काम माझ्याकडे नाही" असे सांगत जबाबदारी टाळत असल्याची तक्रार आहे. विशेष म्हणजे, अनेक कामे पूर्ण झाल्यानंतरही हजेरी मस्टर निघत नसल्याने लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम मिळण्यात विलंब होत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रकरणाची चौकशी करून प्रलंबित कामांबाबत जबाबदारी निश्चित करावी आणि लाभार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे. दरम्यान, ही बातमी दै. विदर्भ केसरीमध्ये प्रसिद्ध होताच मनरेगा विभागाचे अमरावती उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार यांनी तात्काळ दखल घेत अंजनगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना २४ तासांत खुलासा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच, "लाभार्थ्यांची कामे वेळेत पूर्ण करावीत आणि कोणालाही त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी," असे स्पष्ट निर्देशही देण्यात आले आहेत. दरम्यान, दै. विदर्भ केसरीने या प्रश्नाला वाचा फोडल्याबद्दल लाभार्थ्यांनी वृत्तपत्राचे आभार मानले असून, आता गटविकास अधिकारी कल्पना जायफाय यांच्याकडून कोणती कार्यवाही होते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**▶▶सजावट**




रिसोड शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त RA-1 मित्र मंडळाच्या वतीने सुंदर सजावट करण्यात आली
छायाचित्र -प्रदिप खंडारे

## समाधान शिबिरांचा लाभ घ्या शालेय विद्यार्थ्यांनी रॅली काढून केली जनजागृती

**▶विदर्भ केसरी। विठ्ठल भागवत**

मेडशी ग्रामसंसद भवन येथे 17 एप्रिल रोजी आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचा गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे व आपल्या समस्या निकाली काढून शिबिराचा लाभ घ्यावा ह्या करिता आज मेडशी गावातून शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढून जनजागृती करण्यात आली आली. परिसरातील नागरिकांच्या महसूल विषयक तक्रारी व अडचणींचे तात्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने दि.17 एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांना' नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा व सर्व सामान्य जनतेचे प्रश्न गावातच लार्गी लागावे ह्या साठी या समाधान शिबिराचे आयोजन शासन स्तरावर करण्यात येत असते.



जिल्ह्यातील सर्व सहाही तालुक्यांमध्ये प्रत्येकी एका मंडळ स्तरावर ही शिबिरे प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. प्रामुख्याने 7-12 उतारे, फेरफार नोंदी, वारस नोंद, नामांतरण, उत्पन्न व रहिवासी दाखले, जात प्रमाणपत्र, तसेच इतर प्रलंबित प्रकरणांबाबत नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यात आले. अनेक नागरिकांनी या संधीचा लाभ घेत आपल्या समस्या थेट अधिकाऱ्यांसमोर मांडल्या जाऊन त्याचा जागेवरच निपटारा केला जाणार आहे अश्या सोनेरी संधीचे गावकऱ्यांनी लाभ घ्यावा व मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंडळ अधिकारी विजय अवचार,तलाठी केशव अवचार, गजानन उमाळे,कोतवाल घनश्याम साठे,दिलीप ताजने व ग्रामविकास अधिकारी संजय घुगे यांनी केले आहे.

## "प्रभाग १२ मध्ये डुकरांचा कहर"; नागरिकांच्या जीवाला धोका, प्रशासन मात्र गाढ झोपेत

**▶विदर्भ केसरी। सतीश भालेराव**

**नागपूर :-** नगर परिषद वानाडोंगरीच्या हद्दीतील प्रभाग क्रमांक १२ मध्ये मोकाट डुकरांचा अक्षरशः सुळसुळाट झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रस्त्यावर अचानक डुकरे वाहनांसमोर येत असल्याने अपघातांची शक्यता वाढली असून काही ठिकाणी दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. लहान मुलांना चावा घेण्याचा गंभीर धोका निर्माण झाला असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही नगरपरिषदेच्या आरोग्य व स्वच्छता विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. स्वच्छता व आरोग्य ही नगरपरिषदेची मूलभूत जबाबदारी असताना परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याची तीव्र टीका नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, माजी मुख्याधिकारी भारत नंदनवार यांनी शहर डुक्करमुक्त करण्याचा संकल्प केला होता, मात्र सध्याचे मुख्याधिकारी राहुल परिहार हे नागरिकांचे फोन सुद्धा उचलत नसल्याची संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. तसेच आरोग्य सभापतीही या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचे आरोप आहेत.

नागरिकांनी तातडीने डुकरांना पकडण्यासाठी विशेष मोहीम राबविणे, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करणे आणि प्रभागात सुरक्षितता सुनिश्चित करण्याची मागणी जोर धरत आहे. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधींनी मुख्याधिकारी राहुल परिहार यांना फोन द्वारे संपर्क केला असता त्यांनी फोन उचलला नाही. आरोग्य सभापती बाळू मोरे यांनी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी तात्काळ कारवाई करतो असं ते म्हणाले. नगरसेवक नितीन काळे यांच्याशी संपर्क केला असता आम्ही डुकरावर तात्काळ कारवाई करू व डुकरांची विल्हेवाट लावू असं ते म्हणाले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

### सामाजिक एकता व ग्राम विकास मंचचा पुढाकार.

**▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

मुर्तिजापूर व दर्यापूर तालुक्याच्या सीमेवर पूर्णा नदीच्या पवित्र तीरावर वसलेल्या तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे सामाजिक एकता व ग्राम विकास मंचच्या वतीने महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित अभिवादन सोहळ्यात गावातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून महामानवांना मानवंदना वाहिली.

**■ महामानवांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण.**

कार्यक्रमाची सुरुवात आज सकाळी ठीक ८ वाजता करण्यात आली.



सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन करून त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर, क्रांतीसूर्य सत्यशोधक महात्मा जोतिबा फुले यांच्या पुतळ्याचेही पूजन करून अभिवादन करण्यात आले. या पावन दिनाचे औचित्य साधून उपस्थित ग्रामस्थांनी व कार्यकर्त्यांनी एकमेकांना जयंतीच्या शुभेच्छा देऊन सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. मान्यवरांची उपस्थिती या अभिवादन सोहळ्याला परिसरातील सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक दिग्गज व्यक्तिमत्त्वांची उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने राजू दहापुतेअध्यक्ष, लक्षेश्वर संस्थान बाळासाहेब देशमुख अध्यक्ष, संत गजानन महाराज संस्थान नजाकत पटेल* अध्यक्ष, तंटामुक्ती समिती, *दत्तात्रय नाचणे माजी सरपंच, तसेच प्रेमनारायण कैथवास, गोवर्धनजी जामनिक, नाना मेहर, अरविंद जामनिक, कैलास तामसे, दत्ता गव्हाळे, योगेश देशमुख, मंगलासिंह चौहान, ओम बनभेरु, महादेवराव जामनिक, देविदास चव्हाण, भोपत ताई, अक्षय अवघड, शरद डवरे, रवी सुरजुसे, श्रीकांत देशमुख, अरुण सातरोटे, कवी देशमुख, सोमेश दहापुते, धनराज काळमेघ आणि बाबाराव तामसे यांसह अनेक सामाजिक कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती.

**■ सामाजिक ऐक्याचा जागर.**

'सामाजिक एकता व ग्राम विकास मंच'च्या वतीने आयोजित या कार्यक्रमातून गावात एकोपा आणि बंधुभावाचे वातावरण पाहायला मिळाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची कास धरून गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. पूर्णा नदीच्या तीरावर वसलेल्या लाखपूरी गावात पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसरात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# रिसोडमध्ये 'वंचित'चा भीमगर्जना अन् निळा जागर!

### १३५ व्या जयंतीनिमित्त भीमसैनिकांचा जनसागर

**▶विदर्भ केसरी। रिसोड**

भीमराया माझा भीमराया..." अशा घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला,जेव्हा वंचित बहुजन आघाडी रिसोड शहर व तालुक्याच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्यात आली.शहरासह तालुक्यात यानिमित्ताने निळा जनसागर उसळला असून,सर्वत्र भीममय वातावरण निर्माण झाले होते. स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारका समोर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी महामानवाच्या पुतळ्याला पुष्पहार




अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी उपस्थितांनी 'जय भीम'च्या घोषणा देत परिसर निनादवून टाकला. केवळ शहरच नव्हे तर ग्रामीण भागातूनही कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावत डॉ. आंबेडकरांच्या विचारांना उजाळा दिला.यावेळी उपस्थित डॉ.गजानन हुले,गिरिधर शेजुळ, त्यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष महेश तिडके,प्रदिप खंडारे,जियाउर खान, मंगेश राजुरकर, अरुण बोरकर,शेख तोशिफ,शेख वसिम, शुभम जुमडे,राजु कळासरे,यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढवली.

**भारतीय बौद्ध महासभेचा सहभाग**

**■ यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. यामध्ये कैलास पंडित,कैलास जुमडे,सुभाष पंडित,अविनाश पंडित,यांचा समावेश होता. केवळ पुरुषच नव्हे, तर महिलांचा सहभागही लक्षणीय होता.कल्पना जुमडे,विशाखा पंडित,नंदाबाई पोहरे,मंगला खंडारे,प्रज्ञा जुमडे,आणि संघमित्रा जुमडे,यांनी आपल्या संचासह उपस्थित राहून कार्यक्रमाची शिस्त राखली.**

**■ वक्त्यांनी यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीवर प्रकाश टाकला. 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे' हा मंत्र घेऊन तरुणांनी प्रगती करावी,असे आवाहन यावेळी करण्यात आले.शहरात ठिकठिकाणी निळे ध्वज आणि आकर्षक सजावट करण्यात आली होती.या सोहळ्याने रिसोड तालुक्यात 'वंचित'ची संघटनात्मक ताकद आणि भीमसैनिकांची एकजूट पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.**

समाजातील विविध स्तरांतील नागरिक आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे हा सोहळा अभूतपूर्व ठरला.

## समता सैनिक दलाची अभिवादन रॅली



**▶विदर्भ केसरी। यवतमाळ**

भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया अर्थात भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दरवर्षी प्रमाणे या वर्षी मंगळवारी सकाळी सात वाजता समता सैनिक दल मार्च सह धम्मरॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली ७.३० -नेताजी नगर, चंद्रमणी बुद्ध विहार जवळून प्रारंभ, ८.०० कृष्णकुंज सोसायटी, वडगांव परिसर ८.१५ वडगांव, नागभूमी बुद्ध विहार ८.३० दांडेकर लेआऊट, शांतीदुत बुद्ध विहार ८.४५ .उमरसरा, तीन फोटो चौक (शिवाजी गार्डन आर्णी रोड मार्गे संविधान चौकाकडे प्रयाण), ९.०० संविधान चौक,डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ९.२० विदर्भ हाऊसिंग सोसायटी, महाबोधी बुद्ध विहार ९.३५ प्रभात नगर, ओपन प्लेस ९.४० भोसा, यशोधरा बुद्ध विहार १०.१५ पाटीपूरा, डॉ. आंबेडकर चौक १०.३० पिंपळगांव, नालंदा बुद्ध विहार ११.०० शंकर नगर, बोधिसत्व बुद्ध विहार येथे समारोप झाला.

Selected

### घरगुती वातावरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



सिरोंचा : भारतीय कम्युनिस्ट पार्टी (भाकपा) सिरोंचा तालुका सचिव श्री. रवि बारसागंडी यांच्या निवासस्थानी आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व अभिवादनाने करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या समता, बंधुता व न्यायाच्या विचारांचा जागर केला. या प्रसंगी लहान-मोठ्या नागरिकांना बिस्कीट वाटप करून जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाला ग्रामपंचायत सदस्य महेंद्र दुर्गम, उपसरपंच स्वामी गोदारी, पिडगू सत्यम, कोंडाया कटकू, सुदाकर पेदी, नीलम रामकिस्तु, चिपली शंकर तसेच संतोष करसपाली, राजशेखर रवि आणि पत्रकार आनंद भाऊ यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रम शांत, शिस्तबद्ध व उत्साहात पार पडला असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

---

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त रंगय्यापली आरोग्य केंद्राचा आरोग्यदायी उपक्रम



भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून आज प्राथमिक आरोग्य केंद्र, रंगय्यापली येथे अत्यंत उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. या दिनाच्या निमित्ताने गरोदर मातांच्या आरोग्यासाठी एक विशेष आणि स्तुत्य उपक्रम आरोग्य विभागाच्या वतीने राबविण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन मडावी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर त्यांच्या विचारांना आणि कार्याला उपस्थितांनी विनम्र अभिवादन केले.याच सोहळ्याचे औचित्य साधून,'समता फाउंडेशन'च्या सहकार्याने आरोग्य केंद्रांतर्गत नोंदणीकृत गरोदर मातांना प्रोटीन पावडर आणि आवश्यक जीवनसत्त्वांच्या सिरपचे वाटप वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक आणि आरोग्य केंद्रातील संपूर्ण कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

---

### भव्य पदयात्रा रॅलीमध्ये सर्व पक्षातील महिलांनी व नागरिकांनी सहभागी व्हावे - योगिताताई पिपरे

गडचिरोली :- महिलांना संसद व विधानसभा मध्ये 33 टक्के आरक्षण देणारे "नारीशक्ती वंदन" हे ऐतिहासिक विधेयक पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशासमोर आले आहे. महिलांच्या सामर्थ्यावर ठेवलेला हा विश्वास लोकशाही अधिक समावेशक करणार आहे. हा विषय राजकारणाच्या पलीकडचा असून देशातील प्रत्येक महिलेच्या सन्मानाचा आहे. नारीशक्ती वंदन विधेयकाच्या समर्थनार्थ व मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदीं यांना धन्यवाद देण्याकरिता 15 एप्रिल रोजी होणाऱ्या भव्य पदयात्रा रॅलीमध्ये सर्व पक्षातील महिलांनी व नागरिकांनी सहभागी व्हावे. असे आवाहन व निमंत्रण सौ. योगिताताई प्रमोद पिपरे जिल्हाध्यक्ष भाजपा महिला आघाडी (माजी नगराध्यक्ष) तथा नगरसेविका नप गडचिरोली यांनी केले आहे.

# राज्यात उष्णतेचा कहर वाढणार!

## यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर सरकारची मोठी तयारी

**विदर्भ केसरी । मुंबई**

राज्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून आगामी काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. India Meteorological Department कडून अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून काही भागांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नागरिकांच्या संरक्षणासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती (SOP) जाहीर केल्या आहेत. राज्य उष्णता कृती आराखडा आणि IMD च्या रंग-कोडेड सतर्कतेच्या अनुषंगाने या SOP तयार करण्यात आल्या असून उष्णतेशी संबंधित आजार व मृत्यू कमी करण्यावर मुख्य भर देण्यात आला आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री Girish Mahajan यांनी या उपाययोजनांमुळे विशेषतः असंघटित क्षेत्रातील कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. राज्यातील लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलडाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड या १५ उच्च-उष्णता जोखमीच्या जिल्ह्यांमध्ये या SOP ची प्रभावी अंमलबजावणी केली जाणार आहे. पहिली SOP : बाहेर काम करणाऱ्या कामगारांसाठी संरक्षण पहिल्या SOP मध्ये रस्त्यावरील विक्रेते, बांधकाम मजूर, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कर्मचारी आणि रिक्षाचालक यांच्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. IMD च्या पिवळ्या, केशरी आणि लाल





अलर्टनुसार कामाचे वेळापत्रक बदलणे, नियमित पाणी ब्रेक, पाणी बूथ उभारणे, ORS वाटप, सावलीची व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यावर भर देण्यात आला आहे.

दुसरी SOP ही चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाणींमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी आहे. उष्णतेचा ताण कमी करण्यासाठी थंड विश्रांती केंद्रे, शुद्ध पाण्याचा पुरवठा, वायुवीजन, कामाचे नियोजन, जॉब रोटेशन आणि उष्णता आजार ओळखण्यासाठी प्रशिक्षण यांचा समावेश आहे. महिला कामगारांसाठीही स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर आहे. तिसऱ्या SOP मध्ये उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माण व वसाहती विकसित करण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

यामध्ये कूल रूफ, हरित क्षेत्रे, वेंटिलेशन सुधारणा आणि हवामान-संवेदनशील नियोजन यांचा समावेश आहे. तात्काळ, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या उपाययोजनांद्वारे घरांची थर्मल क्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तात्काळ उपायांमध्ये उष्णता जोखीम नकाशे, जनजागृती मोहीम, थंड केंद्रे आणि कमी खर्चातील घर सुधारणा यांचा समावेश आहे. मध्यम मुदतीत गृहनिर्माण योजनांमध्ये उष्णता-प्रतिरोधक डिझाइन समाविष्ट करण्यावर भर दिला जाणार आहे. राज्यात दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असून आगामी काळात उष्णतेची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. India Meteorological Department कडून अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून काही भागांमध्ये उष्णतेची लाट येण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने नागरिकांच्या संरक्षणासाठी तीन व्यापक मानक कार्यपद्धती (SOP) जाहीर केल्या आहेत.

### अंमलबजावणीसाठी समन्वय यंत्रणा सज्ज

या SOP ची अंमलबजावणी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, म्हाडा, सिडको आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून केली जाणार आहे. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष (१०७७), रुग्णवाहिका (१०८) आणि पोलीस हेल्पलाईन (११२) यांसारख्या आपत्कालीन सेवांची माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात येत आहे.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रबोधन कार्यक्रम



**विदर्भ केसरी । देसाईगंज**

देसाईगंज तालुक्यातील सावंगी येथे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आमदार श्री रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून उपस्थित मंडळींना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपण्याचे महत्त्व अधोरेखित करत शिक्षण, समता आणि सामाजिक न्याय यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, पदाधिकारी व युवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

## कोठी आश्रम शाळेत विद्यार्थ्यावर मारहाणीचा गंभीर आरोप; ग्रामस्थांचा संताप!

**विदर्भ केसरी । विनोद सेलोटे**

भामरागड :- शासकीय आश्रम शाळा, कोठी येथील इयत्ता ९ वीतील एका विद्यार्थ्याचे ₹50 हरविल्याची तक्रार सांगण्यासाठी गेल्यानंतर त्याला मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. संबंधित विद्यार्थी मारहाणीमुळे बेशुद्ध पडल्याचे सांगण्यात येत असून या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या प्रकाराची दखल घेत दि. 13/04/2026 रोजी कोठी ग्रामपंचायत येथे गावातील ग्रामस्थ, पालक वर्ग आणि नागरिक



मोठ्या संख्येने एकत्र जमले. बैठकीत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित करत संबंधित जबाबदारांवर तात्काळ कारवाईची जोरदार मागणी करण्यात आली. ग्रामस्थ व पालकांनी शाळेचे अध्यक्ष व मुख्याध्यापक यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे, अशी ठाम मागणी केली. विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय सहन केला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. या बैठकीस मा. प्रकल्प अधिकारी, भामरागड उपस्थित होते. ग्रामस्थ व पालकांनी त्यांच्याकडे लेखी निवेदन सादर करून संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे.ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्याः विद्यार्थ्यावर झालेल्या मारहाणीची चौकशी करावी, दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, शाळेतील शिस्त व देखरेख मजबूत करावी.

### सत्य माहिती द्यावी संतप्त पालकांचा सवालः

शाळा शिक्षणासाठी की विद्यार्थ्यांना मारहाण करण्यासाठी? विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोणाची? या गंभीर प्रकरणाकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून प्रशासन काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## आदर्श महाविद्यालयात राष्ट्रपुरुषांना अभिवादन

**विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम**

देसाईगंज - देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक जडणघडणीत अमूल्य योगदान देणाऱ्या महापुरुषांचे कार्य स्मरून त्यांचे विचार आजच्या युवकांवर बिंबवावेत या उद्देशाने नू. शि. प्र. मंडळ, देसाईगंज द्वारा संचालित स्थानिक आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व रा. से. यो. विभागाद्वारे क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्रीराम गहाणे व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ हितेंद्र धोटे, प्रा. हर्षा बगमारे यांचे प्रमुख उपस्थितीत हा जयंती उत्सव संपन्न झाला. "तत्कालीन सनातनी विचारांविरुद्ध बंड पुकारून जोतिबा फुलेंनी समस्त बहुजन समाजाच्या उद्धारासाठी शिक्षणाचे द्वार उघडले. अविद्या हे सर्व विनाशाचे




कारण असून शिक्षण हे व्यक्तीच्या व समाजाच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम आहे, हे क्रांतिकारी विचार पेरणारे जोतिबा फुलें हे पहिले महापुरुष ठरतात. त्यांनी शेतकऱ्यांचा आसूड लिहून तत्कालीन शेतकऱ्यांच्या व्यथा पुढे आणल्यात. त्यांचे क्रांतिकारी विचार अंगिकारल्यास देशात खऱ्या अर्थाने समता प्रस्थापित होईल," असे प्रतिपादन प्रा. डॉ हितेंद्र धोटे यांनी केले.

"उच्च विद्याविभूषित झाल्यानंतर ब्रिटिशांनी देऊ केलेली एक चांगल्या पगाराची नोकरी न स्वीकारता देशातील वंचितांचा व शोषितांचा विकास यातच आपले यश मानणारे, हिंदू कोड बिल द्वारे समग्र स्त्री जातीचा उद्धार करू इच्छिणारे, कामाचे तास, कामगारांसाठी व नोकरदारांसाठी सुट्टीचा तरतूद व शूद्रातिशुद्रांनाही माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर हे कोण्या एका समाजाचे नाहीत तर समस्त भारतीय समाजाचे पुढारी व दिशादर्शक आहेत. शिक्षण, समाजकारण व अर्थकारनावरील त्यांचे विचार अभ्यासणे व अंगीकारणे आवश्यक आहे," असे प्रभावी मार्गदर्शन महाविद्यालयातील इतिहासाच्या प्राध्यापिका हर्षा बगमारे यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा जोतिबा फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करुण त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. "समाजातील एकंदरीतच विषमता दूर व्हावी म्हणून फुले दांपत्याने केलेले कार्य प्रेरणादायी असून त्यांचे विचार कालातीत आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन विषमतावादी परिस्थितीशी संघर्ष तर केलाच परंतु भविष्यात त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना पण सुचविली. देशाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व स्तरातून त्यांचे विचार स्विकारले जावेत" असे अध्यक्षीय मनोगत डॉ श्रीराम गहाणे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमित मलगाम यांनी केले.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव साजरा



**विदर्भ केसरी । गडचिरोली**

देसाईगंज - आरमोरी येथे १४ एप्रिल २०२६ रोजी तथागत गौतम बुद्ध स्मारक मंडळ, यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य पाय रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रॅली दरम्यान महात्मा ज्योतिबा फुले चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार श्री रामदासजी मसराम यांनी उपस्थित राहून रॅलीत सक्रिय सहभाग नोंदवला.

या प्रसंगी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण करून सामाजिक समतेचा संदेश दिला. कार्यक्रमात मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## मका उत्पादक शेतकरी व्यापाऱ्यांच्या विळख्यात

### अफवांचे पेव अन् कवडीमोल भाव; बळीराजाची लूट थांबणार कधी?

**विदर्भ केसरी । धानोरा**

घाम गाळून पिकवलेला मका आता हातात आला खरा, पण तो विकताना शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी येत आहे. धानोरा तालुक्यात मका खरेदी केंद्र नसल्याचा फायदा घेत खाजगी व्यापाऱ्यांनी लुटीचा बाजार मांडला असून, "आखाती युद्धा"च्या नावाखाली शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत, दिवाकर भोयर यांनी तालुक्यात तातडीने मका खरेदी केंद्र सुरू करण्याची मागणी लावून धरली आहे. 'धाना'ला दिला फाटा, पण 'मका' अडकला काट्यात! उन्हाळी धानासाठी लागणारे अफाट पाणी आणि महावितरणच्या भारनियमनामुळे त्रस्त झालेल्या धानोरा तालुक्यातील शेतकऱ्यांनी गेल्या काही वर्षांत पीक पद्धतीत मोठा बदल केला. 'कमी पाण्यात जास्त फायदा' म्हणून मका पिकाची निवड केली. आज संपूर्ण तालुक्यात मक्याचे पीक डोलत आहे.

मात्र हेच पीक आता शेतकऱ्यांच्या गळ्यातील फास ठरते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे.



व्यापाऱ्यांचे 'वॉरगेम': निर्यातीचा बागुलबुवा बाजारपेठेत सध्या एक विचित्र चित्र पाहायला मिळत आहे. मका खरेदी केंद्र सुरू नसल्याची संधी साधून खाजगी व्यापारी सक्रिय झाले आहेत. "भारताची निर्यात थांबली आहे," "आखाती युद्धामुळे मागणी घटली आहे," अशा अफवा पसरवून मक्याचे भाव जाणीवपूर्वक पाडले जात आहेत. हवालदिल झालेला शेतकरी आपला माल कवडीमोल भावात विकण्यास मजबूर होत आहे.

अस्मानी संकट आणि सुलतानी दुर्लक्ष एकीकडे निसर्गाचा लहरीपणा सुरूच आहे. अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मका पीक आडवे होत असताना, दुसरीकडे शासनस्तरावरून खरेदी केंद्र सुरू करण्यास होत असलेली दिरंगाई ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे. जर वेळच शासकीय केंद्र सुरू झाले नाही, तर धानोरा तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा कर्जाच्या खाईत लोटला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता चेंडू प्रशासनाच्या दरबारी आहे!

### प्रमुख मागण्या ज्याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे:

तातडीने केंद्र: धानोरा तालुक्यात किमान २ ते ३ ठिकाणी मका खरेदी केंद्र त्वरित सुरू करावीत. संस्थांना अधिकार: आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांना मका खरेदीची त्वरित परवानगी द्यावी. लूट थांबवा: अफवा पसरवून कमी दरात मका घेणाऱ्या व्यापाऱ्यांवर प्रशासनाने अंकुश ठेवावा.

"शेतकऱ्यांच्या कष्टाची लूट सुरू आहे. रक्ताचं पाणी करून पिकवलेला माल जर मातीमोल भावात विकला जात असेल, तर ही प्रशासनाची हार आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून मका खरेदी केंद्र सुरू करावे."

— दिवाकर भोयर,
सामाजिक कार्यकर्ते, धानोरा.



## रंगकाम करून प्रशासनाचे 'रंगढंग' उघड

### रंगय्यापल्ली अंगणवाडीत बालकांच्या जिवाशी खेळ!

**विदर्भ केसरी ।**
**लक्ष्मीनारायण आडेटी:**

सिरोंचा तालुक्यातील रंगय्यापल्ली येथील अंगणवाडी केंद्र क्र. १ च्या शौचालयाचे बांधकाम सध्या भ्रष्टाचाराचा आणि प्रशासकीय निष्काळजीपणाचा जिवंत नमुना ठरत आहे. शौचालयाला तडे जाऊन भिंती धोकादायक अवस्थेत असतानाही, प्रशासनाने केवळ वरवरची रंगरंगोटी करून बालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न वाऱ्यावर सोडला आहे. काम अर्धवट स्थितीत ठप्प असल्याने आणि मूळ त्रुटी तशाच असल्याने संतप्त ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

धोकादायक तडे आणि केवळ 'दिखाऊ' रंगरंगोटी काही महिन्यांपूर्वीपासून येथील शौचालयाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी केल्या होत्या. यावर चौकशी समिती नियुक्त करण्यात आली, मात्र समितीने भेट दिल्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाही होण्याऐवजी



केवळ भिंतींना रंग देऊन प्रशासनाने डोळ्यांत धूळफेक करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्या भिंतींना गंभीर तडे गेले आहेत, त्या तड्यांवर रंगाचा लेप देऊन ते लपवण्याचा हा प्रयत्न अत्यंत धक्कादायक आहे. रंगकामाच्या आत भिंतींची पडझड सुरूच असून, हे बांधकाम कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

काम थांबल्याने बालके धोक्यात विशेष म्हणजे, रंगकाम करून हे काम ठप्प झाल्यामुळे बालकांना सुरक्षित शौचालयाची सुविधा अद्यापही उपलब्ध नाही. लघू बालकांच्या आरोग्याशी संबंधित ही बाब असतानाही, प्रशासनाचे 'अंधेर कारभार' सुरूच आहेत. जर ही भिंत कोसळून एखादी



मोठी दुर्घटना घडली, तर त्याला जबाबदार कोण? असा प्रश्न पालक आणि ग्रामस्थ विचारत आहेत.

ग्रामस्थांचा प्रशासनाला इशारा तत्काळ दुरुस्तीची मागणी: केवळ रंगाचा लेप नको, तर संपूर्ण बांधकामाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून तातडीने सुरक्षित बांधकाम उभे करण्याची ग्रामस्थांची मागणी आहे. अंगणवाडी शौचालयची या दुरवस्थेकडे प्रशासनाने त्वरित लक्ष न दिल्यास येणाऱ्या काळात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.आता तरी जिल्हा परिषद प्रशासन जागे होणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



» Selected

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन; जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध कार्यक्रम..!



गडचिरोली (जिमाका) :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त आज गडचिरोली जिल्ह्यात विविध ठिकाणी अभिवादनाचे कार्यक्रम उत्साहात पार पडले. जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित मुख्य कार्यक्रमात मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हा परिषद परिसरातील कॉम्प्लेक्स येथे झालेल्या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास गाडे, अपर जिल्हाधिकारी श्री. नितीन गावंडे, सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त डॉ. सचिन मडावी यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत समाजातील सर्व घटकांनी समानतेच्या तत्त्वांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. डॉ. आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या मूल्यांना दिलेले अधिष्ठान आजही मार्गदर्शक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समाजातील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा संदेशही देण्यात आला. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, नागरिक तसेच युवक-युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### 1 मेपासून टॅक्सी चालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य

नवी दिल्ली : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना धमकी आल्या नंतर ते मराठी भाषे वरून चांगलेच आक्रमक झाले आहेत. एक मे, (महाराष्ट्र दिन)पासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. सरनाईक म्हणाले की, रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे.

# उपवर्गीकरणाच्या नावाखाली आरक्षण संपवण्याचा डाव

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांचा आरोप, उपवर्गीकरणाला का आहे विरोध ?

विदर्भ केसरी । मुंबई

अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे करण्यात येणारे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने रेटले जात असून यामागे आरक्षणाचे मूळ उद्दीष्ट संपवण्याचे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र आहे, असा आरोप करत याप्रकरणी सरकारने जपून पावले टाकीवीत, समाजात मोठी खदखद आहे, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे. अनुसूचित जाती- जमातीच्या आरक्षणाला हात लावण्याचा राज्यांना अधिकार नाही, तो संसदेचा अधिकार आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात राज्यांना मुभा दिली. महायुती सरकारने याप्रकरणी न्या. बदर समिती नेमली, त्या समितीने समाजातल्या कोणत्याही घटकांशी चर्चा केली नाही. समितीचा अहवाल सार्वजनिक नाही. आणि त्यावर निवेदन मागवली आहेत. आंबेडकर जयंती मध्ये समाज मग्न असताना सरकार उपवर्गीकरण पुढे रेटत आहे, असा आरोप आंबेडकर यांनी केला. कर्नाटक राज्यात उपवर्गीकरण करताना शास्त्रीय व संविधानिक पद्धती अवलंबली होती. तसा प्रयत्न महाराष्ट्रात होत नाही. उपवर्गीकरणाविषयी दुमत नाही, मात्र पद्धती चुकीची आहे. सरकारने न्या. बदर समितीचा अहवाल जाहीर करावा. उप वर्गीकरणाचा आधार व पद्धती सांगा. आपण याप्रकरणी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहोत. याप्रकरणी आंबेडकरी समाजात खदखद आहे. ती कधीही बाहेर पडू शकते. सामाजिक तणाव वाढू नये यासाठी सरकारने सावध पावले टाकवीत, असा इशारा आंबेडकर यांनी दिला. महायुती सरकारकडून केले जाणारे



उपवर्गीकरण बेकायदेशीर असून यामुळे कायदेशीर आणि घटनात्मक पेच निर्माण होऊ शकतो. सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने उप-वर्गीकरणाचा अधिकार राज्य सरकारांना दिला असला तरी मूळ सूचीमध्ये बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच आहे. राज्य सरकारांना हा अधिकार मिळाल्यास आरक्षणाचे राजकीयकरण होईल आणि आरक्षणाच्या मूळ हेतूला तडा जाईल. अनुसूचित जाती आरक्षणातून उन्नत गटांना बाहेर काढण्याच्या प्रक्रियेत पारदर्शकता असली पाहिजे. सत्ताधाऱ्यांनी या विषयांकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. विरोधी पक्षांनी याबाबत भूमिका मांडली पाहिजे, अशी भूमिका आंबेडकर यांनी मांडली.

### आमदार मुख्यमंत्र्यांची भेट घेणार :

अनुसूचित जातीच्या १३ टक्के आरक्षणाचे अ, ब, क, ड असे करण्यात येणारे उपवर्गीकरण अशास्त्रीय पद्धतीने रेटले जात असून यामागे आरक्षणाचे मूळ उद्दीष्ट संपवण्याचे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र आहे, असा आरोप करत याप्रकरणी सरकारने जपून पावले टाकीवीत, समाजात मोठी खदखद आहे, असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी दिला आहे. अनुसूचित जाती-जमातीच्या आरक्षणाला हात लावण्याचा राज्यांना अधिकार नाही, तो संसदेचा अधिकार आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालात राज्यांना मुभा दिली.

याप्रकरणी अनुसूचित जातीचे आमदार लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) अर्जुनी मोरगावचे आमदार व माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी सांगितले. उपवर्गीकरणासंदर्भात आंबेडकरी समाजात मोठा असंतोष असून ज्या पद्धतीने उपवर्गीकरण प्रकरण घाईघाईने हाताळले जात आहे, ते चुकीचे आहे, असे बडोले यांचे म्हणणे आहे.

# कामाचे पैसे मागितल्याचा वाद जीवावर बेतला : ठेकेदाराच्या मारहाणीत कामगाराचा मृत्यू..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

नागभिड :- कामाचे थकित पैसे मागण्यासाठी गेलेल्या मजुरावर ठेकेदाराने केलेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नागभीड पोलिसांनी आरोपी ठेकेदार मंगेश अरुण सेलोटे (वय ३१), रा. म्हसली, ह.मु. पंचायत समिती कॉलनी मागे, चिखलपरसोडी रोड, नागभीड याला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुनम लंकेश निरगुळे (२८), रा. पाहार्णी, ता. नागभीड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार त्यांचा भाऊ यशुदास मानिक चुधरी (४०), रा. म्हसली, ता. नागभीड हा मिस्रीकाम



करून उदरनिर्वाह करीत होता. ९ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजताच्या दरम्यान यशुदास हा ठेकेदार मंगेश अरुण सेलोटे (३१), रा. म्हसली, ह.मु. पंचायत समिती कॉलनी मागे, चिखलपरसोडी रोड, नागभीड याच्याकडे कामाचे पैसे मागण्यासाठी गेला होता. यावेळी पैशाच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला.

या वादातून संतप्त झालेल्या आरोपीने यशुदास यांच्या डोक्यावर लाकडी दांड्याने जोरदार प्रहार केला. या हल्ल्यात यशुदास गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना प्रथम नागभीड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, त्यानंतर गडचिरोली येथे हलविण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतांनाच १३ एप्रिल रोजी पहाटे त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, नागभीड पोलिसांनी सुरुवातीला या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १०९ (२) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र मृत्यू झाल्यानंतर कलम १०३ अंतर्गत खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी मंगेश सेलोटे याला अटक केली असून न्यायालयात हजर केले असता त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नागभीड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी दिलीप पोटभरे करीत आहेत.

# जिल्हा अधिवक्ता संघटनेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी..!

विदर्भ केसरी । विनोद सेलोटे

गडचिरोली :- आज १४ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा अधिवक्ता संघटना, गडचिरोली यांच्या वतीने महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा अधिवक्ता संघटनेचे अध्यक्ष ॲड. संजय देशमुख होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ॲड. किशोर आखाडे उपस्थित होते.

यावेळी जिल्हा शासकीय अभियोक्ता ॲड. निळकंठ भांडेकर, जिल्हा लोक अभिरक्षक ॲड. संजय भट, संघटनेचे सचिव ॲड. प्रकाश भोयर, उपाध्यक्ष ॲड. उमेश मडावी, सहसचिव ॲड. उमेश कुकडकर, कोशाध्यक्ष ॲड. पल्लवी केदार, ग्रंथपाल ॲड. पायल धाईत तसेच कार्यकारिणी सदस्य ॲड. गिरीधर बागरे, ॲड. जितेश खोब्रागडे, ॲड. हितेश थोटे, ॲड. निलिमा जुमनाके आणि ॲड. प्रिया मल्लेलवार यांची उपस्थिती होती. तसेच जिल्हा न्यायालयातील अधिवक्त्यांमध्ये ॲड. मृणाल मेश्राम, ॲड. कांचन म्हशाखेत्री, ॲड. संजय जनबंधू, ॲड. रोशन टेंभुर्णे, ॲड. विजय पद्मगिरीवार, ॲड. सोनाली मेश्राम आणि स्नेहा मेश्राम यांनीही सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर अध्यक्ष ॲड. संजय देशमुख यांनी अध्यक्षीय भाषणातून डॉ. आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ॲड. गिरीधर बागरे यांनी केले, तर स्वागत व प्रास्ताविक ॲड. प्रकाश भोयर यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शनही ॲड. प्रकाश भोयर यांनी मानले. या प्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्ष, सामाजिक समतेसाठी केलेले प्रयत्न आणि देशासाठी दिलेल्या अमूल्य योगदानावर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाद्वारे त्यांच्या विचारांचा सन्मान करण्यात येऊन ते समाजापर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला.

# आ. सुधीर मुनगंटीवार यांची आशाताई भोसले यांच्या निधनाबद्दल हृदयस्पर्शी शोकसंवेदना

विदर्भ केसरी । प्रल्हाद मेश्राम

देसाईगंज - भारतीय संगीतविश्वाला आपल्या स्वरांनी मोहिनी घालणाऱ्या, सुरांच्या माध्यमातून कोट्यवधी रसिकांच्या आयुष्यात आनंद, वेदना आणि भावना जिवंत ठेवणाऱ्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या निधनाची बातमी अत्यंत वेदनादायी असून, भारतीय संस्कृतीच्या आकाशातील एक तेजस्वी तारा, चतुरस्त्र सूर आज कायमचा लोप पावला आहे, अशा अत्यंत भावुक शब्दांत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या आहे. आशाताई म्हणजे केवळ एक गायिका नव्हत्या, तर त्या एक युग होत्या. एक अखंड वाहणारी सुरांची गंगा होत्या. त्यांच्या प्रत्येक गीतामध्ये भावना जिवंत व्हायच्या, प्रत्येक सुरामध्ये जीवनाचा स्पंदन असायचे. त्यांच्या आवाजाने अनेक पिढ्यांच्या सुख-दुःखांना शब्द आणि स्वर दिले. त्यामुळेच त्यांचे जाणे हे केवळ एका व्यक्तीचे निधन नसून, एका संपूर्ण सांस्कृतिक पर्वाचा अंत



असल्याची जाणीव मनाला चटका लावणारी आहे, असे त्यांनी नमूद केले. माझ्या सांस्कृतिक कार्य मंत्री पदाच्या कार्यकाळात आशाताईंना महाराष्ट्र भूषण हा सन्मान देण्यात आला हे मी माझे परमभाग्य समजतो. सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून कार्य करत असताना आशाताईंशी अनेकदा भेटण्याचा योग आला होता. त्या प्रत्येक भेटीत त्यांचे साधेपण, आत्मीयता आणि कलेप्रती असलेली अविचल निष्ठा मनाला स्पर्शून जायची. त्यांच्याशी झालेल्या त्या संवादांच्या, त्या क्षणांच्या आठवणी आज मनाला खोलवर भिडत आहेत. आज त्या आठवणींचाच आधार घेऊन त्यांना स्मरावे लागत आहे, हीच सर्वात मोठी वेदना असल्याची भावना सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. आशाताईंचा स्वर आज जरी शांत झाला असला, तरी त्यांचे गीत, त्यांची कला आणि त्यांचा अमर वारसा काळाच्या पलीकडे जिवंत राहील. त्यांच्या सुरांचा गंध हा युगानुयुगे भारतीयांच्या मनात दरवळत राहील. ईश्वर त्यांच्या पुण्यात्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना या अपार दुःखाचा सामना करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना, अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली आहे.



# वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ नागपूर विशेष आमसभा उत्साहात संपन्न!

विदर्भ केसरी । देसाईगंज

रविवारला वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघाची विशेष आमसभा झाडे सुतार भवन जगनाडे चौक नागपूर येथे उत्साहात संपन्न झाली. सभा नियोजित वेळेनुसार सुरू झाली सभेच्या अध्यक्षस्थानी श्री मधुकर शेंडे नागपूर अध्यक्ष वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ नागपूर हे होते. लोहार समाजाचे आराध्य दैवत भगवान विश्वकर्मा व ऐरण देवता यांच्या घोषणेने व पूजनाने सभेची सुरुवात झाली. मंचावर महासंघाचे माजी उपाध्यक्ष जेष्ठ मार्गदर्शक श्री पडघम साहेब संस्थापक सदस्य श्री शिवनकर साहेब प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम महाराष्ट्रातील दिवंगत लोहार समाज यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मुख्य विषयांना सुरुवात करण्यात आली सुरुवातीचे संचालन श्री अनिलजी मेश्राम उपाध्यक्ष महासंघ यांनी केले. सर्व मान्यवरांचे शब्द सुमनाने स्वागत केल्यानंतर सभेच्या



नियोजित विषयाला श्री जितेश मेश्राम सचिव वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ नागपूर यांनी सुरुवात केली. सर्व विषयावर सभेमध्ये सखोल चर्चा करून निर्णय घेण्यात आले.

सभेतील विषयाप्रमाणे महासंघाच्या कार्याचा प्रचार प्रसार व्हावा या उद्देशाने महासंघाचा विस्तार व विविध कार्यकारी पदे निर्माण करणे या विषयांतर्गत अनेक इच्छुक समाज बांधवांना महासंघाच्या तालुका जिल्हा विभाग व महासंघ स्तरावर नियुक्ती प्रदान करण्यात आल्या. सभेमध्ये साठ समाज बांधव पदाधिकारी यांनी उपस्थिती नोंदविली. अध्यक्षीय परवानगीने वेळेवर येणारे विषय या विषयांतर्गत अनेक समाज बांधवांनी आपल्या संकल्पना महासंघासमोर मांडल्या. विषयाच्या अनुषंगाने सविस्तर माहिती समाज बांधवांना देण्यात आली. सभेचे आभार प्रदर्शन श्री उत्तम शेंडे युवा अध्यक्ष यांनी केले व सभा अध्यक्ष परवानगीने संपल्याचे जाहीर केले. वैदर्भीय गाडी लोहार व तत्सम जाती महासंघ नागपूर चे कार्य/ जबाबदारी/ प्रचार प्रसार/ विकेंद्रीकरण करण्यासाठी अनेक इच्छुक व उपस्थित समाज बांधवांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने १) श्री माधवराव पडघन साहेब जेष्ठ मार्गदर्शक/ सल्लागार महासंघ नागपूर २) श्री ज्ञानेश्वर डहाके सर सल्लागार महासंघ नागपूर ३) श्री मेघश्याम दाभेकर प्रसिद्धी प्रमुख महासंघ नागपूर ४) श्री विजयराव दाभेकर विदर्भ संघटक ५) श्री किशोरभाऊ रामटेके यूवाध्यक्ष भंडारा जिल्हा ६) श्री राजकुमार मेश्राम कार्यकारी अध्यक्ष गोंदिया जिल्हा ७) श्री राजपाल बावणकर सर सल्लागार गोंदिया जिल्हा ८) श्री सतिशभाऊ भूरे नागपूर शहर अध्यक्ष (पूर्व विभाग) ९) श्री महादेव केळकर कार्याध्यक्ष नागपूर १०) श्री गजूभाऊ बावणे चंद्रपूर जिल्हा उपाध्यक्ष ११) श्री राजेश हरिहर कोराडी सर्कल यूवाध्यक्ष १२) श्री भिष्माभाऊ शेंडे चंद्रपूर जिल्हा यूवाध्यक्ष १३)शांतनू दाभेकर यूवासंघटक नागपूर विभाग १४) श्री श्रीराम बावणे संघटक नागपूर १५) नरेंद्र आताग्रे प्रचारक कोराडी सर्कल.

# राज्याची वाटचाल ‘उडता पंजाब’च्या दिशेने?

## नेस्को प्रकरणानंतर पुन्हा प्रश्नचिन्ह, राज्यभरात कारवाया वाढल्या

विदर्भ केसरी । मुंबई

राज्यात अंमली पदार्थांच्या वाढत्या तस्करी आणि सेवनाच्या घटनांमुळे परिस्थिती गंभीर बनत असून, राज्याची वाटचाल ‘उडता पंजाब’सारख्या धोकादायक दिशेने होत असल्याची चिंता व्यक्त होत आहे. गोरेगाव येथील NESCO Exhibition Centre येथे झालेल्या संगीत कार्यक्रमात दोन तरुणांचा अंमली पदार्थांच्या अति सेवनामुळे मृत्यू झाल्याची घटना समोर आल्यानंतर हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. दहा वर्षांपूर्वी



देशात सर्वाधिक अंमली पदार्थांची तस्करी पंजाबमध्ये होत होती. त्या काळात दरवर्षी आठ ते दहा हजार प्रकरणे नोंदवली जात होती. सध्या महाराष्ट्रात ही संख्या तीन ते चार हजारांच्या दरम्यान पोहोचली असून, वाढत्या घटनांनी प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. मुंबई शहर अंमली पदार्थ तस्करीचे प्रमुख केंद्र बनत असल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे. त्यानंतर पुणे, विशेषतः आयटी क्षेत्रात, अंमली पदार्थांच्या सेवनाचे प्रमाण वाढले आहे. याशिवाय नाशिक, संभाजीनगर, नागपूर यांसारख्या मोठ्या शहरांबरोबरच अमरावती, अकोला आणि नागपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातही अंमली पदार्थांचे जाळे विस्तारत असल्याचे दिसून येत आहे. राज्य पोलिस आणि अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने 2024 मध्ये मोठ्या प्रमाणात कारवाया करत तब्बल 4 हजार 249 कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त केले होते. त्या वर्षी 14 हजार 230 आरोपींना अटक करण्यात आली होती. 2025 मध्ये ही संख्या वाढून 15 हजार 933 वर पोहोचली.

### पुण्यात वाढती व्यसनाधीनता

मुख्यमंत्री यांनी या वाढत्या तस्करीचा गंभीरपणे विचार करून विविध उपाययोजना राबविण्यात येत असल्याचे स्पष्ट केले आहे. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईसाठी NDPS Act अंतर्गत मकोका लागू करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच तस्करांची संपत्ती जप्त करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. या कारवाईदरम्यान तस्करीला मदत करणाऱ्या 17 पोलिस कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांना अटक करून त्यांना देशाबाहेर हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे.

# येचली येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

विदर्भ केसरी । भामरागड

आज दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी ग्रामपंचायत येचली येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली. गावातील आंबेडकर चौक येथे आयोजित या मुख्य कार्यक्रमात महामानवांना अभिवादन करण्यासाठी जनसागर लोटला होता. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी राजे अंब्रीशराव आत्राम यांचे कट्टर समर्थक, गावातील धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते तथा भाजपचे तालुका महामंत्री श्री. वैभव पुजलवार यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो' आणि 'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. याप्रसंगी बोलताना वैभव पुजलवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला समता, बंधुता आणि न्यायाचा विचार हा केवळ एका समाजासाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांवर चालणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन त्यांनी केले.

मान्यवरांची उपस्थिती: या कार्यक्रमाला ग्रामपंचायत येचलीचे माजी उपसरपंच बापुजी दुर्गे, मालय्या दुर्गे, विलास वनकर, संतोष दुर्गे, बाबुराव दुर्गे, किशोर दुर्गे, काशिनाथ सारंपलीवार, दौलत झाडे, वेंकटी दुर्गे, शुभम दुर्गे, राजकुमार दुर्गे, शामराव दुर्गे, बकाराम दुर्गे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी येचली येथील समस्त गावकऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. उपस्थित सर्व नागरिकांनी यावेळी सामाजिक ऐक्य आणि महामानवांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.